|| जय माता जी ||



|| माता वारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ११ | अंक : ४५ | सोमवार दि. ३० ऑक्टोंबर २०२३ ते रविवार दि. ०५ नोव्हेंबर २०२३ | पाने : ८ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

## चारित्र्याच्या संशयावरून साधला डाव पतीने पत्नीवर घातले कुऱ्हाडीचे घाव

सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी

पती-पत्नीचे नाते विश्वासावर अवलंबून असते. अशावेळी दोघांनीही एकमेकांचा विश्वास जपायचा असतो. पण जर का या विश्वासाला तडा गेला कि त्यातून काहीही घडू शकते. सोलापूर जिल्ह्यातील ममदाबाद येथील बसवराज हनुमंत बिराजदार याने चारित्र्याच्या संशयावरून पत्नी सावित्रा हिची कुऱ्हाडीचे घाव घालून निर्घुणपणे हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी पतीला अटक केली आहे. सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील ममदाबाद येथे पतीने चारित्र्याच्या संशयावरून रविवारी राहत्या ...पान २ वर

# स्वार्थापायी रक्षाबंधन कमकुवत ठरले भावानेच बहिणींना विष देऊन मारले






अलिबाग/क्राईम रिपोर्टर


**सध्याचे युग हे विज्ञान युग आहे. विज्ञानाच्या जोरावर माणसाने खूप प्रगती केली आहे. विज्ञानाने जगाचा चेहरा मोहरा बदलून टाकला. पण माणसाचा स्वभाव मात्र विज्ञानालाही बदलता आला नाही आणि हीच खरी विज्ञानयुगाची शोकांतिका आहे. पूर्वी एकत्रित कुटुंबात नातेसंबंध जपले जायचे. रक्ताच्या नात्यातील माणसांसाठी प्रसंगी जीव देण्याचीही माणसाची तयारी असायची, पण आता मात्र रक्ताच्या नात्यातील माणसेच शुल्लक स्वार्थासाठी रक्ताच्या नात्याला काळिमा फासतात. पैसा, संपत्ती, भौतिकसुख या पलीकडे माणसाला काहीच दिसत नाही. त्यामुळे भाऊ-भावाचा, बाप-मुलाचा, तर मुलगा आई-वडिलांचा जीव घ्यायला मागेपुढे पाहत नाही. पैशांसमोर नाती गोती, दोस्ती यारी सारे काही दुय्यम ठरू लागले आहे. लोक पूर्णपणे स्वार्थी बनले आहेत आणि स्वार्थाच्या बाजारात फक्त आणि फक्त स्वतःचा विचार केला जातो. जे माझे आहे ते माझेच आहे, पण जे दुसऱ्याचे आहे ते सुद्धा माझे कसे होईल याचा प्रत्येक जण विचार करीत असतो. बहिण भावाचे नाते हे तर पवित्र नाते असते. बहिण आपल्या कुलशीलाच्या रक्षणासाठी भावाच्या हातावर राखी बांधते. पण तोच भाऊ जेंव्हा स्वतःच्या स्वार्थासाठी तिच्या जीवावर उठतो तेंव्हा रक्ताची नाती संपुष्टात आलेली असतात.**

अलिबागमध्ये अशाच एका घटनेत वनविभागात कामाला असलेल्या भावाला अनुकंपा तत्वावरील नोकरीत कायम होण्यासाठी दोन बहिणी सह्या देत नव्हत्या. तसेच संपत्तीतही वाटा मागत होत्या. म्हणून एका भावाने आपल्या दोन बहिणींना सूप मधून विष देऊन त्यांची हत्या केली. या घटनेने संपूर्ण अलिबाग हादरले आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी भावाला अटक केली आहे.

अनुकंपावर नोकरी मिळविण्यासाठी भावाने सूप मध्ये दोन सख्या बहिणींना विषारी औषध देऊन त्यांची हत्या केली असल्याची घटना अलिबाग तालुक्यातील चौळ भोवाळे येथे घडली असल्याचे समोर आले असून यामुळे मोठी खळबळ उडाली आहे. १६ ऑक्टोबर रोजी अलिबाग तालक्यातील चौल भोवाळे गावात जेवणातून विषबाधा झाली असल्याने सोनाली मोहिते (३४) व स्नेहल मोहिते (३०) या दोन बहिणींनी अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात दाखल केले होते. मात्र, उपचारादरम्यान सोनालीचा त्याच दिवशी मृत्यू झाला तर दुसरी बहिण स्नेहल हीचा एम.जी.एम रुग्णालय मध्ये मृत्यू झाला होता. यावेळी स्नेहलचा मृत्युपूर्व जबाब घेण्यात आला होता. घटनेची फिर्याद त्यांचा भाऊ गणेश यानेच दिली होती व अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती. दरम्यान सोनालीच्या शव विच्छेदन अहवालानुसार तिचा मृत्यू जेवणातील विषबाधेमुळे झाला असल्याचे समोर आले. यामुळे पोलिसांचा संशय वाढला व तपासला वेगळे वळण मिळाले होते. तपासादरम्यान असे निष्पन्न झाले की आरोपी गणेश मोहीते यांचे आई व बहिणीसोबत पटत नव्हते. त्याचे वडील वन विभागात कामाला होते. त्यांच्यामध्ये नेहमी प्रॉपर्टी व अनुकंपाच्या नोकरीवरून वाद होता. अनुकंपा तत्वावर नोकरीमध्ये कायम करण्यासाठी लागणारी संमती दोन्ही बहिणी देत नव्हत्या. याचा राग त्याच्या मनात होता. म्हणून त्याने दोन्ही बहिणींना सूप मध्ये विष घालून पिण्यास दिले व त्यानंतर पाणी पिल्याने ...पान २ वर

# एक नव्हे तिचे अनेक होते यार प्रियकरानेच केले प्रेयसीला ठार





नालासोपारा/क्राईम रिपोर्टर

**'लिव्ह इन' रिलेशन मधले संबंध हे तकलादू असतात. अशा संबंधात रहाणारे 'लिव्ह इन'च्या नात्याबद्दल फारसे गंभीर नसतात. त्यामुळे हि नाती विश्वसनीय नसल्याने फारशी टिकत नाहीत. नालासोपारा येथे गेल्या सहा महिन्यांपासून 'लिव्ह इन'मध्ये राहणाऱ्या एका जोडप्याची अशीच शोकांतिका झाली. 'लिव्ह इन'मधील महिलेच्या चारित्र्यावर संशय आल्याने तिच्या सोबत राहणाऱ्या तिच्या पार्टनरने तिची निर्घुण हत्या केली आणि पळून गेला. या प्रकरणी तुळींज पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून फरारी आरोपीचा शोध घेत आहेत.**

पोलिसांनी दिलेल्या माहिती नुसार नालासोपारा पुर्व येथील नागीनदास पाड्यात सप्तशीला सुनील सावंत (३०) हि महिला अमोल दाभोलकर याच्या सोबत गेल्या सहा महिन्यांपासून 'लिव्ह इन' रिलेशनशिपमध्ये राहत होती. त्यासाठी तिने भाड्याने खोली घेतली होती. सप्तशीला लोअर परेल येथील लोढा हाऊसमध्ये हाउसकीपर होती. तर तिचा 'लिव्ह इन' मधला पार्टनर अमोल बेरोजगार होता. दरम्यान अमोलला सप्तशीलाच्या चारित्र्यावर संशय होता. कारण तिचे ती काम करीत असलेल्या ठिकाणच्या अंकुश दहिवलकर नावाच्या व्यक्तीशी अनैतिक संबंध होते. त्याच्या बरोबरचे तिचे अश्लील व्हिडियो त्याने पाहिले होते. इतकेच नव्हे तर तिने तिच्या पतीला सोडल्यानंतर चिपळूण येथील एका व्यक्तीशी त्याला मुल देण्यासाठी शारीरिक संबंध ठेवले होते. त्याचेही व्हिडीओ तिच्या मोबाईलमध्ये सापडले. चिपळूणच्या माणसाला मुल देऊन तिने दाभोलकर बरोबर येऊन राहिली होती ही सगळी माहिती मिळताच अमोल दाभोलकर चिडला होता. त्यावरून रोज दोघांमध्ये भांडणे व्हायची. अखेर बुधवारी रात्री अमोलने धारदार शास्त्राने सप्तशीलाचा गळा चिरला तसेच तिचा पाय तोडला आणि घराला टाळे लाऊन पोबारा केला. तत्पूर्वी त्याला या प्रकरणातील फिर्यादी शितल जाधव हिच्या पतीने सप्तशीला कुठे आहे असे विचारले असता ती कामावरून आली नाही मी तिलाच शोधतोय असे सांगितले. दरम्यान ३ दिवसांनी शेजाऱ्यांना सप्तशीलाच्या खोलीतून दुर्गंधी येऊ लागल्याने त्यांनी तुळींज पोलिसांना कळवले. पोलिसांनी घटनास्थळी येऊन दार तोडून आत प्रवेश केला असता आत कुजलेल्या अवस्थेत सप्तशीलाचा मृतदेह आढळला. त्यानंतर मोरेगाव येथे राहणाऱ्या शीतल विश्वनाथ जाधव यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला व युद्ध पातळीवर अमोलचा शोध सुरु केला. त्याचा मोबाईल लोकेशन टाकला असता त्याचे लोकेशन ...पान २ वर

## २५ लाखांसाठी डॉक्टर पतीचा तोल गेला पत्नीची हत्या करून अपघाताचा बनाव केला

नाशिक/क्राईम रिपोर्टर



**हुंडा घेणे कायद्याने गुन्हा असला तरी काही लोक वेगळ्या मार्गाने पत्नीवर माहेरहून पैसे आणण्यासाठी दबाव आणतात. नाशिक जिल्ह्यातील न्यायडोंगरी गावातील डॉ. किशोर शेवाळे आणि त्याचे वडील नंदू शेवाळे यांना गावात चांगले घर आणि दवाखान्यासाठी पैसे हवे होते. किशोरची पत्नी भाग्यश्री ही सुद्धा डॉक्टर होती. पण दवाखाना आणि नवे घर बांधण्या इतका त्यांच्याकडे पैसा नव्हता. त्यामुळे डॉ. किशोर व त्याचे वडील नंदू यांनी भाग्यश्रीला माहेरहून २५ लाख रुपये आणायला सांगितले. पण तिने नकार दिला. तसे ते दोघे तिचा मानसिक छळ करू लागले. तरीही ती ऐकत नव्हती. त्यामुळे बाप बेट्यानी तिचा खून करून मोटार अपघातात तिचा मृत्यू झाल्याचा बनाव केला. पण भाग्यश्रीच्या भावाला संशय आल्याने या बाप बेट्यांचे भांडे फुटले व पोलिसांनी दोघांना अटक केली.**

नांदगाव तालुक्यातील न्यायडोंगरी गावामध्ये डॉ. किशोर नंदू शेवाळे आणि डॉ. भाग्यश्री हे दाम्पत्य रहात होते. त्यांच्यासमवेत डॉ. किशोर यांचे वडील नंदू राधो शेवाळे हेही रहात होते. डॉ.किशोर आणि डॉ.भाग्यश्री हे दोघेही व्यवसायाने डॉक्टर होते. आपण डॉक्टर आहोत, त्या मानाने आपले मोठे घर असावे. ...पान २ वर

# भाईगिरी अखेर शुभमच्या अंगाशी आली ज्याला धमकी दिली त्यानेच हत्या केली





धुळे/क्राईम रिपोर्टर

**दादागिरी, गुंडागर्दी फार काल चालत नाही. कारण जे शास्त्राच्या धाकावर जगतात त्यांचा मृत्यूही शस्त्रानेच होतो. धुळ्या नजीकच्या मनमाडी भागात राहणारा शुभम याचेही तसेच झाले. आई-वडील नसल्याने मामाच्या घरी आजोळी लहानाचे मोठे झालेल्या शुभम व विनायक यांना तसा कोणाचा धाक नव्हता. त्यामुळे शुभम बिघडला आणि वाईट मित्रांच्या नादाला लागून भाई बनला. एकदा त्याच्या मामाच्या घरावर दगडफेक झाली ती लाल डोळा उर्फ महेश पवार यानेच केली या संशयातून त्याने महेश पवारला धमकी दिली आणि याच धमकीमुळे महेश पवारने साथीदारांच्या मदतीने त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.**

साळुंखे दाम्पत्याचे आकस्मिक निधन झाल्यानंतर त्यांची मुले शुभम आणि विनायक ही पोरकी झाली. 'आता या मुलांचं कसं होणार?' अशी चर्चा नातेवाईकांमध्ये होवू लागली. अशावेळी त्या मुलांचे मामा किरण जाधव आणि संजय जाधव हे पुढे आले. ते नातेवाईकांना म्हणाले, 'आमच्या भाच्यांचे पालन-पोषण आम्ही करू. तुम्ही त्याची काळजी नका करू.' त्या दोन्ही मुलांना ते आपल्या घरी घेवून गेले. त्यांनी त्या दोघांचे पालन-पोषण चांगल्या रितीने केले. शुभम आणि विनायक हे आपल्या आजोळीच लहानाचे मोठे झाले. मनमाडी जीन परिसरात त्यांचे आजोळ होते. शुभम, विनायक मोठे झाले होते. आता किरण आणि संजय या मामांना दोन्ही भाच्यांचा ...पान २ वर

## दारुड्याला धमकावणे अंगाशी आले रागाच्या भरात वृद्ध महिलेला ठार केले



मयत लक्ष्मीबाई



आरोपी

कोल्हापूर/क्राईम रिपोर्टर

**आजकाल कोणाला समजावून सांगण्याची सोय राहिलेली नाही आणि व्यसनी माणसाला तर कुणीही समजुतीच्या चार गोष्टी सांगू नयेत. कारण उपदेश करणाऱ्याचा त्याला राग येतो आणि रागाच्या भरात त्याच्या हातून काहीही घडू शकते. जवाहर मधील रोहीधास कॉलनीत राहणाऱ्या प्रतिक गुरुळे याला दारूचे व्यसन होते. त्यावरून घरात त्याची भांडणे व्हायची त्याच परिसरातील लक्ष्मीबाई क्षीरसागर या वयोवृद्ध महिलेने अनेक वेळा प्रतीकला समजावले. पण तो ऐकत नव्हता. एकदा तो शेतात दारू पीत बसलेला असल्याचे लक्ष्मीने पाहिले आणि त्याला घरच्यांना सांगण्याची धमकी दिली. त्यामुळे प्रतिक घाबरला आणि त्याने लक्ष्मीच्या डोक्यात दगड घालून तिची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**

जवाहनगर मधील संत रोहिदास कॉलनीमध्ये प्रतिक गुरूले हा आपल्या आई वडिलासह राहयला आहे. त्याने सिव्हिल इंजिनियरचा डिप्लोमा केला असून तो गेल्या दोन एक वर्षात नोकरीच्या शोधात होता. परंतु त्याला त्याच्या मनासारखी नोकरी ...पान २ वर

## अश्लील व्हिडिओचा वाद प्राणावर बेतला दोन मित्रांनी साकीब पठाणचा जीव घेतला

निपाणी/क्राईम रिपोर्टर



मयत साकिब

**अल्पवयीन मुलांना पालकांनी सुरुवातीपासुनच धाकात ठेवायचे असते. पण काही मुले लहानपणापासूनच वाईट संगतीने बिघडलेली असतात. अशी मुले आई-वडिलानाही जुमानत नाहीत. गोकुळ शिरगाव मधील संभाजी नगर येथे राहणाऱ्या समशेर पठाण यांचा मुलगा साकीब हा सुद्धा असाच बिघडला होता. त्यामुळे एकदा वडिलांनी त्याला मारले. त्यामुळे तो रागाने घरातून निघून गेला. त्यानंतर मित्राच्या मोबाईलवर ब्ल्यू फिल्म पहात असताना मित्रासोबत त्याचे भांडण झाले. या भांडणातून झालेल्या हाणामारीत त्याच्या मित्राने आपल्या साथीदाराच्या मदतीने साकीबचा खून केला. या प्रकरणी पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली आहे.**



समीर पठाण हे कोल्हापूर जिल्हयातील गोकुळ शिरगाव येथील एमआयडीसीतील एका कारखान्यात रोजंदारीवर कामाला आहेत. ते जुने संभाजीनगर येथे गेल्या ३० वर्षांपासून पत्नी सिमरन आणि मुलगा साकीब याचेसह राहयला आहेत. साकीब हा आठवीत शिकत असून तो शाळा आणि मित्र याचेत रमत असे. समीर पठाण हे सकाळी लवकर कामाला गेले की, रात्री उशिराच घराकडे परतत होते. त्यामुळे त्याचे सहसा साकीबकडे लक्ष नव्हते. तो आपल्या समवयस्यक मुलाच्यात रमत होता. त्याच्याबरोबर खेळत होता. तसा त्याचा स्वभाव हा भांडखोर आणि चिडखोर असल्याने त्याचे सहसा कोणाशी पटत नव्हते. त्याच्या या स्वभावामुळे त्याची रोज भांडणे घराकडे येत होती. त्याची ...पान ६ वर

## एकतर्फी प्रेम करणारा वासनेने पेटला बलात्कार करून तरुणीचा जीव घेतला

कोल्हापूर (पेठ वडगाव)/क्राईम रिपोर्टर



आरोपी सनी

**जी गोष्ट आपल्याला हवी असते ती प्रेमाने मिळाली नाही कि मग जबरदस्तीने मिळवण्याचा प्रयत्न केला जातो आणि त्यातूनही अपयश आले तर माणूस कोणत्याही थराला जातो. पेठ वडगाव येथील वीट भट्टीवर काम करणाऱ्या अनिल कुंभार याच्या मुलीवर एका तरुणाचे एकतर्फी प्रेम होते, पण ती मात्र त्याला भाव देत नव्हती. त्यामुळे तो भयंकर चिडला आणि एके दिवशी तिला रस्त्यात गाठून तिच्यावर बलात्कार करून त्याने तिची गळा दाबून हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**

खंडु अडगले हे आपल्या पत्नी, मुलगी आणि मुलासह पेठवडगाव जवळील वाठार येथील साखरवाडी येथील अनिल कुंभार याच्या वीटभट्टीवर काम करीत आहेत. त्याची मोठी मुलगी पुजा ही घरच्या परिस्थीतीला हातभार लावण्यासाठी म्हणून वाठार येथील पुजा फुटवेअर मध्ये काम करीत होती. ती सकाळी कामाला गेली की, रात्री उशिरा घरी परतत होती.ती त्या दुकानात काम करीत असताना तिची ओळख ही वाठार येथील सनी अरूण कांबळे याच्याशी झाली. तो बांधकाम कामगार म्हणून काम करीत होता. तो पुजा ...पान ६ वर

## पैशांवरून झालेला वाद विकोपाला गेला बार मध्येच मित्राने मित्राचा गळा चिरला

मुंबई/एस.कुमार



**पैशावरून झालेले वाद जर विकोपाला गेले तर त्यातून काहीही घडू शकते. खास करून असा वाद जर दारूच्या अड्ड्यावर झाला. तर मग पिणारे दोस्ती यारी बघत नाहीत. नशेत त्यांच्या हातून काहीही घडू शकते. कॅटरिंगचे काम करणाऱ्या तीन कर्मचाऱ्यांमध्ये १ हजार रुपयांवरून बारमध्ये वाद झाला आणि या वादात हाणामारी होऊन अरमानने इलियास याचा गळा चिरला. या प्रकरणी एकाला अटक करण्यात आली आहे, तर दुसरा आरोपी फरारी आहे.**



दिनांक १० आक्टोबर २०२३ चा दिवस होता. सकाळीची वेळ होती. त्या दिवशी आर सी एफ पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक रणजित जाधव हे रात्रपाळीला कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून काम पाहत होते. तर ठाणे अंमलदार म्हणून पोलीस उप निरीक्षक काकडे हे काम पाहत होते. सकाळी ७ वाजता पोलिसांना फोन वरून माहिती मिळाली की, त्यांच्या हद्दीतील शंकर देऊळ गोडाऊन या ठिकाणी एका व्यक्तीचा गळा चिरलेल्या अवस्थेत मृतदेह पडला असल्याची माहिती मिळाली. पोलीस पथक लगेच घटनास्थळी दाखल झाले. काही वेळातच पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळची पाहणी केली असता, कॅटरिंगचे काम करणाऱ्या एका व्यक्तीचा गळा कापलेल्या ...पान ६ वर

पान १ वरून...

## चारित्र्याच्या संशयावरून साधला...

घरी २८ वर्षे पत्नीचा कुराडीने मारून खून केला आरोपी पती बसवराज हनुमंत बिराजदार (वय ३५) यास पोलिसांनी अटक केली असून अक्कलकोट उत्तर पोलीस स्टेशनमध्ये खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सावित्रा हनुमंत बिराजदार (वय २८) असे मयत महिलेचे नाव आहे. मयताचे वडील हनुमंत सिद्रामप्पा इब्रामपूर (वय ७४) यांनी फिर्याद दिली आहे. तालुक्यातील ममदाबाद येथील आरोपी बसवराज हनुमंत बिराजदार वय ३५ याने बायकोच्या अनैतिक संबंधाच्या संशयावरून आपल्या पत्नीचा रविवारी पहाटे सहा वाजण्याच्या सुमारास खून केला. तिला घरात त्रास देऊन लोखंडी कुऱ्हाडीने तिचा गळ्यावर मारून गंभीर जखमी करून खून केला गेल्या अनेक महिन्यापासून आपली मृत पत्नी सावित्रा बसवराज बिराजदार याचा चारित्र्याच्या संशयावरून छळ करीत होता. रविवारी पहाटे कुऱ्हाडीने वार करून पत्नीचे मुंडके शरीरापासून वेगळे केले. बिराजदार दांपत्याच्या दोन मुली, एक मुलगा असून आरोपी पती शेतीचे कामे करत होता, तर पत्नी घरातील कामे करायची, पुढील अधिक तपास पोलीस सब इन्स्पेक्टर पंडित चव्हाण हे करीत आहेत, घटनास्थळाला उपविभागीय पोलीस अधिकारी विलास यामावर यांनी भेट दिली. आरोपी सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास स्वतः उत्तर पोलीस स्टेशनमध्ये हजर झाला. चारित्र्याच्या संशयावरून खून केल्याची कबुली त्यांनी दिली आहे आरोपीला ताब्यात घेतले असून येथील गुन्ह्यातील कुऱ्हाड हस्तगत केली आहे.

## एक नव्हे तिचे अनेक होते यार...

चिपळूणमध्ये आढळले. पण पोलीस तिथे पोहचायच्या आतच तो तिथून पाळला होता. मात्र सप्तशीलाने चिपळूणमध्ये ज्या माणसाला मुल दिले होते त्याच्याकडे अमोल गेला होता व त्याने त्या दोघांचे अश्लिल व्हिडीओ दाखवून त्याच्याकडूनही त्याने ५ हजार रुपये उकळले होते. आता तुळींज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुधीर चव्हाण या प्रकरणी पुढील तपास करीत आहेत.

## २५ लाखांसाठी डॉक्टर पतीचा तोल...

दवाखानाही तसाच मोठा असावा' असे डॉ. किशोर यास वाटत होते. त्याच्या वडीलांना म्हणजे नंदू शेवाळे यांनाही तसेच वाटत होते. त्यांची स्वप्ने मोठी असली तरी ती पूर्ण करण्यासाठी पैसा तेवढा उपलब्ध नव्हता. डॉक्टरकीच्या व्यवसायातूनही इतका पैसा झटपट मिळू शकणार नव्हता, पण तरीही आपले घर, रूग्णालय मोठे असावे अशी त्यांची स्वप्ने होती. डॉ. किशोर आणि त्याचे वडील नंदू हे नेहमी या विषयावर बोलत असत, पण त्यांची चर्चा पैशावरच अडत असे. इतका पैसा कोठून मिळवायचा यावर त्यांची चर्चा होत असे. एके दिवशी त्यांनी केलेल्या चर्चेत असे ठरवले की, डॉ. किशोरच्या पत्नीने म्हणजे डॉ. भाग्यश्री हिने आपल्या माहेरून २५ लाख रूपये आणावेत. तसे आपण तिला आणायला सांगू, तिने माहेरून २५ लाख रूपये आणले की मस्तपैकी घर आणि दवाखाना बांधू. दोघांची अशी चर्चा झाल्यावर डॉ. किशोर आणि त्याचे वडील नंदू शेवाळे यांनी भाग्यश्रीजवळ हा प्रस्ताव मांडला. त्यांचा हा प्रस्ताव ऐकताच ती गडबडून गेली. आपले वडील इतकी रक्कम देवू शकणार नाहीत हे तिला माहिती होते. तिला सुरूवातीला काय बोलावे सुचेना. ती फक्त शांत बसून राहिली, पण पुन्हा तिच्या नवऱ्याने आणि सासऱ्याने 'तू पैसे मागून घे' असे म्हणताच ती म्हणाली, 'एवढी मोठी रक्कम माझे आई-वडील, भाऊ कोणीच देवू शकणार नाहीत. ते कुठून आणतील एवढी रक्कम ? मी काही त्यांच्याकडे पैसे मागणार नाही.' भाग्यश्रीने असे स्पष्ट सांगितले असले तरी किशोर आणि नंदू हे दोघेही तिचे म्हणणे ऐकून घ्यायला तयार नव्हते. तिने २५ लाख रूपये माहेरून आणूनच द्यावेत असा त्यांचा अट्टाहास होता. त्या दिवसानंतर ते दोघे दररोजच तिच्याकडे २५ लाखाचा विषय काढत आणि तू हे पैसे माहेरून मागून घे असा आग्रह करत. तिच्यामागे सतत लकडा लावला जात असे. २५ लाख आणण्यासाठी ते तिच्यावर दबाव टाकू लागले. आपल्यावर दबाव येतो, मानसिक छळ होतोय हे लक्षात आल्यावर तिने ही बाब आपल्या माहेरी सांगितली, पण तिच्या माहेरच्या लोकांचा नाईलाज होता. ते इतकी रक्कम देवू शकत नव्हते. या विषयावरून नवरा आणि सासऱ्याकडून दररोज बोलले जात असल्यामुळे माहेरचा फोन आल्यावर ती 'आज काय घडले, पैशासाठी आपला नवरा, सासरा कसे बोलले' हे ती सांगत असे. आतापर्यंत डॉ. किशोर आणि नंदू शेवाळे हे दोघे फक्त बोलून तिच्यावर पैसे आणण्यासाठी दबाव, करत होते, त्यामुळे भाग्यश्रीला मानसिक त्रास होत होता, पण आता मात्र हा त्रास जास्तच वाढू लागला. आपण तिला त्रास दिला तर ती मजबूर होवून माहेरहून पैसे आणेल असेच त्या दोघांना वाटत होते, पण भाग्यश्रीच्या माहेरची तेवढी परिस्थिती नसल्याने पैसे आणू शकत नव्हती.

इकडे डॉ. किशोर आणि त्याच्या वडीलांना घर आणि दवाखाना बांधण्याची घाई होती. ती भाग्यश्रीने पैसे आणल्याशिवाय पूर्ण होणार नव्हती, म्हणून ते दोघेही भाग्यश्रीवर चिडून होते. त्यांना आता भाग्यश्रीबद्दल आपुलकी न वाटता तिच्याबद्दल द्वेष, मत्सर वाटू लागला. इतका की त्यांना आता ती नकोशी वाटू लागली. हा विचार दिवसेंदिवस वाढतच चालल्याने त्यांच्या डोक्यात तिच्याबद्दल वेगळेच विचार सुरु झाले. बुधवार दि. २७ सप्टेंबर २०२३ रोजीची संध्याकाळी साडेसहा ते रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास नांदगाव चाळीसगाव रोडवरील मन्याड फाटा येथे मोटरसायकलला अपघात होवून त्यात डॉ.भाग्यश्री गंभीर जखमी झाली. त्यातच ती मरण पावली असल्याची खबर डॉ. किशोर शेवाळे याने चाळीसगाव पोलीस ठाण्याला दिली. चाळीसगाव पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यू म्हणून नोंद झाली. दरम्यान ही घटना नांदगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडल्याने चाळीसगावच्या पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी हे प्रकरण नांदगाव पोलीस ठाण्याकडे वर्ग केले. भाग्यश्री हिच्यावर अंत्यसंस्कार करून तिला निरोप दिल्यानंतर तिचा भाऊ सचिन कैलास साळुंखे रा. वाळुंज, छत्रपती संभाजीनगर याने घटनास्थळाची पहाणी करून माहिती घेतली, तेंव्हा मात्र त्याला या मृत्यूबाबत संशय येवू लागला. अपघाताच्या घटनेनंतर तब्बल १५ दिवसांनी भाग्यश्रीचा भाऊ सचिन साळुंखे याने नांदगाव पोलीस ठाण्यात येवून फिर्याद दाखल केली. आपल्या बहीणीला तिचा पती डॉ. किशोर आणि सासरा नंदू शेवाळे हे दोघे 'तू तुझ्या माहेरून घर व दवाखाना बांधण्यासाठी २५ लाख रूपये घेवून ये' असे वेळोवेळी सांगत होते. तिच्यावर दबाव टाकत होते. ती मागणी भाग्यश्रीने पूर्ण न केल्याने संगनमत करून दोघांनी आपली बहीण डॉ. भाग्यश्री हिला दगडाने ठेचून व काचेची बाटली मारून ठार मारल्याचे सचिन साळुंखे याने नांदगाव पोलीस ठाण्यात सांगितले. तशा आशयाची फिर्याद त्याने दिली. त्यानुसार नांदगाव पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ४४५/२०२३ भा.दं. वि. कलम ३०२, ३०४ (ब) व ३४ कलमाखाली गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी पती डॉ. किशोर नंदू शेवाळे व सासरे नंदू राधो शेवाळे या दोघांना अटक केली. पोलीस अधीक्षक शहाजी उमाप, अप्पर पोलीस अधीक्षक अनिकेत भारती, उपविभागीय अधिकारी सोहेल शेख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रितम चौधरी, उपनिरीक्षक नितीन खडांगळे, मनोज वाघमारे व संतोष बहादूर हे करत आहेत. पैशासाठी डॉक्टर पतीने वडीलांच्या मदतीने डॉक्टर पत्नीची दगडाने ठेचून हत्या केल्याची घटना घडल्याने एकच खळबळ उडाली आहे.

## स्वार्थापायी रक्षाबंधन कमकुवत ...

त्यातून विषबाधा झाली असे दाखविण्याचा प्रयत्न आरोपीने केला. तसेच पोलिसांचे लक्ष भरकटवण्यासाठी नातेवाईक व शेजाऱ्यांनी हे केले असावे असे वातावरण निर्माण केले होते. मात्र, पोलीस तपासात आरोपीने गुगलवर वेगवेगळे विषारी औषधे सर्च केले असल्याचे व त्यात वास न येणारे विषारी औषधाचा अभ्यास केला होता असे पोलिसांच्या निदर्शनास आले. तसेच त्याच्या कारची झडती घेतली असता उंदीर मारण्याचे रेटोल या औषधाची माहितीपत्र मिळून आले. कोणाला संशय येवू नये म्हणून आरोपीने एक महिना अगोदर पासून घरात सूप बनविणे आणि सुपचे महत्व सांगणे सुरू केले होते अशी माहिती पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिली. आरोपीची कसून तपासणी केली असता आरोपीने दोन्ही बहीणींना संपविले असल्याचा कबुली दिली असल्याचे अपर पोलिस अधिक्षक अतुल झेंडे यांनी सांगितले. या घटनेचा अधिक तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे करीत आहेत.

## भाईगिरी अखेर शुभमच्या अंगाशी...

आधार वाटू लागला. ते रहात होते त्या परिसरातील उनाड मुलांची संगत दुर्दैवाने शुभमला लागली. त्याचा ठसा त्याच्या वागण्या-बोलण्यात उमटू लागला. त्याला कमी श्रमात, कमी वेळेत गर्भश्रीमंत होण्याची स्वप्ने पडू लागली. त्यातूनच तो लहान-मोठ्या चोऱ्या, रस्तालूट, सुपाऱ्या घेवून दादागिरी करणे असे प्रकार करू लागला. परिणामतः त्याच्या विरोधात पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल होवू लागले. गुन्हेगारी जगतात शुभमचे पाऊल पडल्याने तो स्वैर, बिनधास्त झाला होता. त्यामुळे त्याचे दुश्मनही वाढत होते. शुभम हा निगरगट्ट होता, त्याच्या वाट्याला सहसा कुणी जात नसे, पण तरीही लहान-मोठ्या प्रमाणात वादविवाद होत असत. त्यातून हाणामाऱ्याही होत असत. गेल्या वर्षी शुभमने याच परिसरात रहाणाऱ्या एका राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याची संगत सोडली, त्यामुळे त्या पदाधिकाऱ्याचा रोष शुभमने ओढवून घेतला होता. आपल्या व्यवसायातील बारकावे शुभमला माहित असल्याने त्याचे लांब रहाणे त्या कार्यकर्त्याला धोक्याचे वाटत होते. त्या कार्यकर्त्याने शुभमला समजावण्याचा खूप प्रयत्न केला, पण शुभमच्या डोक्यात हवा शिरली होती. त्यावेळी त्याने त्या कार्यकर्त्यासोबत रहाण्यास स्पष्ट नकार दिला आणि त्यातून शुभमचा त्याच्या जुन्या सहकाऱ्यांशी वाद झाला. या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. शुभमला त्यावेळी बेदम मारहाण करून हल्लेखोरांनी त्याचा एक पाय जायबंदी केला. शुभमने त्या संदर्भात आझादनगर पोलीस स्टेशनला संबंधिताविरूद्ध फिर्याद देवून त्यांच्याविरूद्ध प्राणघातक हल्ला केला म्हणून गुन्हाही दाखल केला. तेंव्हापासून शुभमला टार्गेट करून मारहाणीचे प्रकार घडत होते. गणेशोत्सवाची सांगता झाल्यानंतर शुभम ज्या मामांकडे रहातो, त्या मामांच्या घरावर एका रात्री तुफान दगडफेक करण्यात आली होती. शुभमला दहशतीखाली ठेवण्याचा तो प्रयत्न होता. या दगडफेकीत कुणाचा पुढाकार होता याची कल्पना शुभमला होती. रविवार दि. ८ ऑक्टोबर २०२३ रोजी त्याने सकाळी-सकाळीच 'लाल डोळा' म्हणून गुन्हेगारी जगतात ओळखल्या जाणाऱ्या महेश उर्फ घनःश्याम प्रकाश पवार याला त्याच्या स्वामी नारायण कॉलनीतील घरी जावून जाब विचारला. त्यावेळी लाल डोळा उर्फ महेश पवारने कानावर हात ठेवले. 'माझा याच्याशी काही संबंध नाही' असे त्याने सांगितले. त्यावेळी शुभमने यापुढे असा प्रयत्न केला तर जन्माची अद्दल घडवेन असा महेशला दम दिला. ही बाब लाल डोळाने आपल्या सहकाऱ्यांना सांगितली. 'ठीक आहे. शुभमने तुझा गेम करण्याआधी आपणच त्याचा गेम करू' असे त्या सहकाऱ्यांनी त्याला सांगितले. रविवार दि. ८ ऑक्टोबर २०२३ रोजीच सायंकाळी लाल डोळाचे सहकारी गणेश अनिल पाटील, गणेश साहेबराव माळी, जगदीश रघुनाथ चौधरी, अक्षय श्रावण साळवे, जिभ्या उर्फ जयेश रविंद्र खरात हे सर्व जण एकत्र जमले. त्यांनी यथेच्छ नशापाणी केले आणि शुभमला जन्माची अद्दल घडवण्याचा मनसुबा व्यक्त केला. त्याच रात्री साडेदहा वाजता लाल डोळा उर्फ महेश पवारने शुभमला फोन केला, तेंव्हा शुभम हा गांधी चौकातील गोल पोलीस ठाण्यात एका पोलीस कॉन्स्टेबलबरोबर गप्पा मारत बसला होता. त्याच्याबरोबर त्याचा मित्र शिवम प्रकाश गोरे आणि सोनू आघाव हे दोघे होते. लाल डोळाने शुभमला, 'तू कुठे आहेस' असे विचारले, तेंव्हा त्याने 'का?' असे उत्तर दिले. 'आज तुझा गेम करायचा आहे' असे उत्तर लाल डोळा याने दिले. यावर शुभमने त्याची औकात काढली. 'मी गांधी चौकातील पोलीस ठाण्यात आहे. तू तेथेच ये' असे शुभमने त्याला सांगितले. त्यानंतर १९ मिनिटांत लाल डोळा उर्फ महेश पवार, अक्षय साळवे, गणेश माळी, भूषण तोडकर, जगदीश चौधरी हे मोटरसायकलने गांधी चौकात आले. त्यांच्या हातात कोयता, लोखंडी रॉड, काठी आदी प्राणघातक शस्त्रे होती. लाल डोळाने पोलीस ठाण्यात बसलेल्या शुभमला हाक मारून बाहेर बोलावले. तो बाहेर येताच लाल डोळा उर्फ महेश पवार, अक्षय साळवे, गणेश माळी, भूषण बीडकर, जिभ्या उर्फ जयेश पाटील आदींनी शुभमला घेरत त्याला शिवीगाळ करत बेदम मारहाण करण्यास सुरूवात केली.

यावेळी शुभम एकटाच होता. त्या सहा जणांनी त्याला मारत मारत हनुमान मंदिराच्या मागे आणले. तेथे जमिनीवर पाडून लाथा-बुक्क्यांनी तुडवले. त्यानंतर त्याला बळजबरीने मोटरसायकलवर बसवून वरखेडा गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावरून महानगरपालिकेच्या कचरा डेपोत आणून फेकले. त्या सर्वांनी त्याला बेदम मारहाण करत त्याच्या पायावर मोठमोठे दगड टाकून पायाची हाडे मोडली. धारदार कोयत्याने सर्वांगावर गंभीर जखमा केल्या, तो निपचित पडताच ते सर्व जण पळून गेले. दरम्यान आझादनगर पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांना या प्राणघातक हल्ल्याची माहिती मिळताच ते घटनास्थळी आले. त्यांनी जखमी अवस्थेतील शुभमला उपचारार्थ हिरे शासकीय महाविद्यालयाच्या रूग्णालयात ॲडमीट केले. शुभमची गंभीर अवस्था लक्षात घेवून त्याच्यावर तात्काळ उपचार सुरू केले. शरीरावर सर्वत्र जखमा होत्या. बरेच रक्त वाहून गेले होते. तशाही अवस्थेत शुभम रात्रभर मृत्यूशी झुंज देत होता. दरम्यान पोलिसांनी शुभमच्या घरी माहिती दिली. त्यानंतर शुभमचा भाऊ विनायक हा आपल्या मावस भावाबरोबर रूग्णालयात आला. विनायकने शुभमला झाल्या प्रकाराबाबत विचारले, तेंव्हा शुभमने सांगितलेली माहिती विनायकने आपल्या मोबाईलमध्ये रेकॉर्ड करून घेतली. त्याआधारे आझादनगर पोलीस स्टेशनमध्ये गणेश अनिल पाटील, महेश उर्फ घनश्याम प्रकाश पवार (लाल डोळा), गणेश साहेबराव माळी, जगदीश रघुनाथ चौधरी, अक्षय श्रावण साळवे, जयेश उर्फ जिभ्या रविंद्र खरात यांच्याविरोधात प्राणघातक हल्ला केल्याबाबत आझादनगर पोलीस स्टेशनला फिर्याद दाखल केली. यानंतर दि. ९ ऑक्टोबर २०२३ रोजी शुभमचा मृत्यू झाला. तो रहात असलेल्या परिसरात सन्नाटा पसरला. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता जिल्हा पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, अप्पर पोलीस अधीक्षक किशोर काळे, उपअधीक्षक सचिन हिरे यांनी घटनास्थळांना भेट देत प्रतिबंधात्मक उपाययोजनेच्या कारणास्तव सर्वत्र चोख बंदोबस्त ठेवला. जिल्हा शासकीय रूग्णालयात शुभमच्या मृतदेहाचे पोस्टमार्टम झाल्यानंतर शुभमचा मृतदेह त्याच्या भावाच्या हवाली करण्यात आला. शोकाकुल वातावरणात देवपुरातील स्मशानभूमीत शुभमच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यविधी आटोपताच शुभमचे मामा किरण जाधव, संजय जाधव, भाऊ विनायक, हिरण जाधव, संदीप उघडे, नंदू मोरे, अतिष कदम, राजेंद्र पाटील, किरण ठाकरे, गौरव जांभळे, मोहन पाटील, निखिल रागडे, उमेश पाल, सतिश चौधरी, तुषार चौधरी, नरेंद्र चौधरी, पंकज वाघ, कृष्णा सुर्यवंशी, सोनू चौधरी, धर्मेंद्र वाघ, संतोष शेंडगे, रजनीश निंबाळकर, शिवम गोरे, किरण सुर्यवंशी, सौरभ गवळी, अविनाश माने, महेंद्र साबळे आदींनी जिल्हा पोलीस अधीक्षक संजय बारकुंड यांची भेट घेवून गुन्हेगारांचे फोनवरील बोलणे, परिसरातील सी.सी.टी.व्ही. फुटेज, मास्टर माईंड आदीबाबत सखोल चौकशी होवून गुन्हेगारांवर खुनाचा गुन्हा दाखल व्हावा, त्यांना ताबडतोब अटक करावी अशा मागण्यांचे निवेदन सादर केले. आझादनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नितीन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी संशयित हल्लेखोर गणेश अनिल पाटील, महेश उर्फ घनःश्याम प्रकाश पवार, गणेश साहेबराव माळी, जगदीश रघुनाथ चौधरी, अक्षय श्रावण साळवे, जिभ्या उर्फ जयेश रविंद्र खरात यांच्यावर गुन्हा रजि. क्रमांक १७५/२०२३ अन्वये भा.दं.वि. कलम ३०२, ३६४, १२० (ब), ३२३, ५०४, ५०६, १४३, १४९ सह आर्म ॲक्ट ४/२५ महा.पो. ॲ. कलम ३७ (१) (३) चे उल्लंघन १३५ प्रमाणे गुन्हा नोंद केला. त्यांच्या शोधासाठी तीन पथके तयार करण्यात आली. अप्पर पोलीस अधीक्षक किशोर काळे, उपअधीक्षक सचिन हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाची तीन पथके पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली आणि आझादनगर पोलीस स्टेशनची तीन शोध पथके पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या नेतृत्वाखाली कामाला लागली. या घटनेतील संशयित गणेश पाटील हा फरार होण्याच्या तयारीत असल्याची गोपनीय खबर तपास पथकाला मिळली. पथकाने तातडीने हालचाली करत त्याला त्याच्या घरापासून काही अंतरावरच घेरले आणि ताब्यात घेतले. त्याच्या अटकेने इतर संशयितांना अटक करण्याचे पोलिसांचे काम सुकर झाले. यातील मुख्य संशयित लाल डोळा उर्फ महेश पवार हा अट्टल गुन्हेगार आहे. त्याच्यावर विविध प्रकारचे १५ गुन्हे दाखल आहेत, तर गणेश साहेबराव माळी हा शांतीनगर परिसरातील ५० खोली भागात रहाणाऱ्या या संशयितावर दोन खतरनाक गुन्हे दाखल आहेत. स्वामी नारायण कॉलनीत रहाणारा जगदीश चौधरी याच्यावरही विविध पोलीस स्टेशनमध्ये चार गुन्हे दाखल आहेत. गणेश माळी, महेश पवार (लाल डोळा), जगदीश चौधरी हे तिघेही कायम एकत्र असतात अशी माहिती अटक केलेल्या गणेश पाटील याच्याकडून पोलिसांना मिळाल्याने पोलिसांनी या तिघांवर लक्ष केंद्रीत केले. हे तिघे एका मोटरसायकलवरून संगमनेर मार्गे जात असल्याची खात्रीशीर माहिती मिळताच तपास पथक त्यांच्या मागावर निघाले. दिघी गावातील मॅगझीन चौकात हे तिघे एका मोटरसायकलवर असल्याची माहिती मिळताच तपास पथकाने तिकडे आपला मोर्चा वळवला. याचा सुगावा संशयितांना लागताच त्यांनी धूम ठोकण्याचा प्रयत्न केला, पण पोलिसांनी पाठलाग करत त्यांना ताब्यात घेतलेच. या संशयितांपैकी अक्षय साळवे हा सुद्धा गुन्हेगार वृत्तीचा आहे. त्याच्यावरही विविध पोलीस स्टेशनमध्ये विविध गुन्हे दाखल आहेत. जिभ्या उर्फ जयेश रघुनाथ खरात हा धुळ्यातील अट्टल गुन्हेगार आहे. त्याच्यावरही विविध पोलीस स्टेशनमध्ये बारा गुन्हे दाखल आहेत. या दोघा संशयितांना ताब्यात घेण्याच्या कारवाईला वेग देण्यात आला. हे दोघे गुन्हेगार सोबत असतात अशी माहिती पोलिसांना प्राप्त झाल्याने त्या दोघांच्या मोबाईल नंबरच्या आधारावर त्यांनी त्यांचा पिच्छा सुरू केला. अक्षय आणि जिभ्या हे राजस्थानमध्ये पळून जाण्याच्या तयारीत असतांना ते दोघे एका आरामदायी बसमधून प्रवास करत असतांना रतलाम येथे ती बस अडवून पोलिसांनी अक्षय साळवे आणि जयेश खरात यांना ताब्यात घेतले. शुभमचा भाऊ विनायक जगन साळुंके याने आझादनगर पोलीस स्टेशनला दाखल केलेल्या फिर्यादीतील संशयित हल्लेखोरांना अल्पावधीत गजाआड करण्यात पोलिसांना यश आले. गांधी पुतळ्याजवळ संशयित हल्लेखोरांनी शुभमला घेरण्यापासून त्याला जमिनीवर पाडून मारण्यापर्यंतचे चित्रीकरण, तसेच हल्लेखोर ज्या मोटरसायकलवरून आले ते चित्रीकरण, तसेच शुभमला मारठोक करत त्याला मोटरसायकलवरून कचरा डेपोकडे नेल्याचे चित्रीकरण पोलिसांना उपलब्ध झाल्याने हल्लेखोर निष्पन्न व्हायला वेळ लागला नाही, तसेच त्यांना अटक करायलाही वेळ लागला नाही. या गुन्ह्यातील कथित मास्टर माईंड कोण? हे अद्याप तपासातून निष्पन्न झाले नाही, शिवाय शुभमवर शांत डोक्याने नियोजन पद्धतीने प्राणघातक हल्ला करण्याचे नेमके कारणही हे प्रकरण शब्दबद्ध होईपर्यंत गुलदस्त्यातच राहिले आहे.

## दारुड्याला धमकावणे अंगाशी आले...

मिळाली नसल्याने तो सध्या बेरोजगार होता. त्याचे हाताला काम नव्हते. त्यातच त्याने गेल्या सहा महिन्यापूर्वी प्रेमविवाह केला असल्याने त्याचे घरचे लोक त्याच्या विरोधात होते. एक तर नोकरी नाही, त्यातच त्याने प्रेमविवाह केला असल्याने दोघांच्या पोटापाण्याला कोण घालणार असा प्रश्न होता. या कारणातून त्याचे त्याच्या आई वडिलाबरोबर रोज भांडणे होत होती. अलिकडच्या दोन तीन वर्षात प्रतिक हा दारूच्या आणि गांजाच्या आहारी गेला होता. तो आपल्या इतर मित्रांच्या संगतीने दारू प्यायला जात होता. नोकरी शोधण्याच्या मागे न लागता तो दारू प्यायला मित्रांच्याबरोबर बाहेर जायचा. रोज रात्री घराकडे दारू पिऊन येऊ लागल्याने त्याच्या आई वडिलांनी त्याला सक्त ताकीद दिली की,तु तुझ्या बायकोला घे आणि घराबाहेर पड. तुझे तु बघ जा असे सांगितले. खरे तर त्याचे आई वडिल त्याच्या दारूच्या आणि गांजाच्या व्यसनापुढे हतबल झाले होते. त्यांनी त्याला बऱ्याचवेळेला व्यसन सोडण्याबद्दल समजावून सांगितले होते. परंतु त्याच्या डोक्यात काय बसले होते कोणास ठाऊक तो काही कामधंदा करीत नव्हता. काही केल्या त्याचे व्यसन सुटत नव्हते. त्याला व्यसन सोडण्याबद्दल त्याच्या घरच्या लोकांनी समज दिली असली तरी तो काही व्यसन सोडत नव्हता. तो दारूच्या नशेत आई वडिलाबरोबर सारखी भांडणे काढत असल्याने त्याच्या शेजाऱ्यांनी ही त्याला समजावून सांगून नीट वागण्याचा सल्ला दिला होता.त्याचे घरचे लोक तर त्याला व्यसन सोडण्यासाठी दबाव आणत होते.त्याच्या घराशेजारी असणाऱ्या सुभाषनगर येथे लक्ष्मी विलास क्षीरसागर या वयोवृध्द महिला राहत होत्या. त्यांनी ही त्याला व्यसन सोडण्याबद्दल समज दिला होता. हल्ली तो चोरून दारू पित होता. गेल्या तीन आठवडयापूर्वी तो सरनाईक मळ्यात एकटा दारू पित बसला असताना लक्ष्मी क्षीरसागर यांनी बघितले होते.त्यावेळी लक्ष्मी क्षीरसागर यांनी प्रतिकच्या घरच्या लोकांना सांगितले की, तो सरनाईक मळ्यात दिवसा दारू पित बसला आहे.लक्ष्मीबाईने प्रतिक दारू पित बसला असल्याचे सांगितल्याने त्याच्या घरात भांडणे लागली होती. त्यावेळी शेवटी वैतागून प्रतिकने घरातून काढता पाय घेतला. पण भांडण काही मिटले नव्हते. आपल्या घरात लक्ष्मीबाईने भांडणे लावले असल्याचे प्रतिकला समजले होते.त्यामुळे तो त्या म्हातारीवर चिडून होता. त्याच्या मनात लक्ष्मीबाई विषयी राग होता.ही म्हातारी माझ्या घरात भांडणे लावते काय असे म्हणत तो तिच्यावर डुख धरून होता. या म्हातारीचा आणि आपला संबंध काय? ती मला कोण उपदेशाचा डोस पाजणारा असे त्याच्या मनात होते. तिने घरात सांगितले तरी तो दारू प्यायचे काही कमी करीत नव्हता. लक्ष्मीबाईने जरी त्याच्या घरात त्याच्याबद्दल सांगितले तरी तिच्या ही मनात त्याच्याबद्दल काही नव्हते. शनिवार दि.२१ रोजी लक्ष्मीबाई या रात्री ९ वाजणेच्या सुमारास आपल्या नातीला घेऊन देवी बसवली होती त्या ठिकाणी गेल्या. तेथे दांडियाचा खेळण्याचा कार्यक्रम असल्याने आपल्या नातीला सोडून त्या परत आपल्या घराकडे येत होत्या. त्यावेळी रात्रीच्या अंधारात सरनाईक माळावरती प्रतिक गुरूले हा परत दारू पित बसला असल्याचे त्यांनी बघितले. त्यांना बघून प्रतिक हा अंधारातून बाजुला जात होता. परंतु लक्ष्मीबाई यांनी त्याला हटकले. त्याला बोलावून घेऊन तु परत दारू प्यायला बसला आहेस. तुला ताकीद देऊन ही तू ऐकत नाहीस थांब मी आताच्या आता तुझ्या घराकडे जाते आणि तुझ्या आई वडिलांना सांगते. त्यांनी असे म्हटल्यावर प्रतिक हा घाबरला होता. आता ही म्हातारी परत आपल्या घरात जावूस आपल्या विषय नको ते सांगणार आणि परत आपल्याला बोल बसणार हे त्याच्या लक्षात आले. अगोदरच त्याने दारू बरोबर गांजा ही ओढला असल्याने त्याला बऱ्यापैकी नशा झाली होती.त्या नशेत तो तर्र होता. लक्ष्मीबाई त्याला नको ते बोलत होत्या.त्याचे बोलणे ऐकून त्याला राग आला. तो नशेत असल्याने त्याला लक्ष्मीबाईचा राग आला. त्याने अंधारात रस्त्याला कुणी नाही हे बघून रागाच्या भरात लक्ष्मीबाईना ओढत नेले आणि एका घराच्या शेजारच्या कंपांऊडच्या भिंतीला त्याचे डोके जोरात आपटले. त्यासरशी लक्ष्मीबाई या जोरात खाली पडल्या. त्याचवेळी त्याने बाजुलाच पडलेला एक दगड उचलला आणि त्याच्या डोक्यात जोरात हाणला. त्या सरशी त्या बेशुध्द पडल्या. त्यातच त्याचा जागीच मृत्यू झाला. त्याचा मृत्यू झाल्याचे त्याच्या लक्षात आल्यावर प्रतिक हा कोणाला काही लक्षात येणार नाही अशा बेताने निघून गेला. इकडे रात्री ११ वाजता आजीची वाट बघून नात दांडिया खेळून घरी परत आली तरी आजी घराकडे कशी काय परत आली नाही म्हणून त्याचा मुलगा सून काळजी करू लागले होते. त्यांनी रात्री उशिरा त्याचा शोध घ्यायला सुरूवात केली परंतु आजुबाजूच्या परिसरात त्याचा शोध कुठेच लागला नाही. त्याच्या मुलाने त्या बेपत्ता झाले असल्याची तक्रार राजारामपुरी पोलीस ठाण्यात रात्री उशिरा दाखल केली. दुसऱ्या दिवशी रविवारी सकाळी लक्ष्मीबाई राहत असलेल्या घरापासून जवळ पास दोनशे मीटर अंतरावर चर्चच्या भिंतीच्या पाठीमागे लक्ष्मीबाई या मृतावस्थेत पडल्या असल्याचे राजू सोनीकर, सुवर्णा पोळ यांना दिसून आले. त्यांनी या घटनेची माहिती लक्ष्मीबाई क्षीरसागर याच्या घरच्या लोकांना दिली. घटनास्थळी मयत लक्ष्मीबाई याचा मुलगा सून नातू यांनी जावून पाहिले. लक्ष्मीबाई यांच्या अंगावर सोन्याचे दागिने असल्याने दागिन्याच्या हव्यासापोठीकुणी अज्ञाताने त्याचा खून केला असावा अशी शंका त्याच्या घरच्या लोकांना आली. परंतु मयत लक्ष्मीबाई याच्या अंगावरील सोन्याचे दागिने जसेच्या तसे होते. कुणी तरी या घटनेची माहिती राजारामपुरी पोलीस ठाण्याला दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अप्पर पोलीस अधिक्षक जयश्री देसाई, पोलीस उपाक्षिक टिके यांनी घटनास्थळी भेट देवून घटनेची माहिती घेतली. राजारामपुरी पोलीसांनी घटनेचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सीपीआर रुग्णालयात पाठवून दिला. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना मयत लक्ष्मीबाई याचे कोणाबरोबर कसले भांडण झाले होते का? याची माहिती घेत होते. दागिने चोरीच्या उद्देशाने तरी त्याचा खुन झाला नव्हता. मग त्याचा खून कुणी आणि कशासाठी केला याची माहिती पोलीस घेत असताना लक्ष्मीबाई यांना आदल्या रात्री संत रोहिदासनगर मधील प्रतिक गुरूले याचेबरोबर वाद घालत असताना बघितले होते. यावरून पोलीसांनी घटनास्थळावरील चर्चच्या सीसीटीव्हीचे कॅमरे तपासले असता त्यात लक्ष्मीबाई क्षीरसागर यांना प्रतिक गुरूले हा बाजुला ओढत नेत असताना दिसत होते.यावरून पोलीस प्रतिकचा शोध घेत होते. काही वेळातच तो स्थानिक गुन्हे अन्वेषणच्या पथकाच्या गळाला लागला. जवाहरनगर परिसरातील एका बारमध्ये तो पोलीसांना सापडला. पोलीसांनी त्याला ताब्यात घेऊन राजारामपुरी पोलीस ठाण्यात आणून त्याचेकडे मयत लक्ष्मीबाई क्षीरसागर याच्या विषयी चौकशी केली असता तो पोलीसांना उडवा-उडवीचे उत्तरे देत होता. पोलीसांनी त्याला आपला पोलीसी खाक्या दाखविताच त्याने आपला गुन्हा कबुल करीत तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. त्याने आपला गुन्हा कबुल केल्यावर पोलीसांनी मयत लक्ष्मीबाई क्षीरसागर याच्या मुलाकडून या घटनेची फिर्याद लिहून घेतली. त्याने दिलेल्या फिर्यादीवरून लक्ष्मीबाई विलास क्षीरसागर (वय ६५) याच्या खून प्रकरणी प्रतिक विनायक गुरूले (वय २२) याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल केला. त्याला मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याला तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. या घटनेचा पुढील तपास पो.निरी.तनपुरे याच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहेत. दारूची आणि गांजाची नशा सुशिक्षीत माणसाला ही कुठल्या कुठे घेऊन जाते याचे हे उदाहरण म्हणावे लागेल. अति व्यसनात माणुस बुडाला की, त्याच्या हातून गंभीर घटना घडते हेच या घटनेवरून दिसून येते.

# भिवंडीत पाऊणे सहा लाखांच्या कफ सिरपच्या ४ हजार बाटल्या जप्त, गुन्हे शाखेची कारवाई!

**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी शहरात नशेसाठी कफ सिरपचा वापर मोठ्या प्रमाणात होत असून वेळो वेळी कारवाई करून कफ सिरापचा नशेसाठी होणार वापर थोपवण्यात पोलिसांना अपयश येत आहे. नुकताच भिवंडी गुन्हे शाखेने भोईवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत कारवाई करीत ५ लाख ७१ हजार रुपये किमतीच्या ४ हजार मादक पदार्थ म्हणून उपयोगात येणाऱ्या कप सिरपच्या बाटल्यांचा साठा जप्त केला आहे. भिवंडी शहरात मोठ्या प्रमाणावर नशेसाठी मादक पदार्थ म्हणून खोकल्याच्या विकारावर औषध म्हणून उपयोगात येणारे कफ सिरप सर्रास पणे वापरले जाते. भिवंडी गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन गायकवाड यांना गुप्त बातमीदारा मार्फत शहरातील ईदु कम्पाउंड, गौरीपाडा येथील आझमी इमारतीचे जिन्याला लागुन असलेल्या एका गाळयात मोठ्या प्रमाणावर कफ सिराप च्या बाटल्यांचा साठा असल्याची माहिती गुप्त बातमीदारामार्फत समजली होती.त्यानुसार भिवंडी गुन्हे शाखेच्या पोलिस पथकाने घटनास्थळी छापा टाकला असता त्या ठिकाणी Windlas Cough Syrup, WIOREX Cough Syrup, Maxcoff Cough Syrup अशा तीन वेगवेगळ्या नावाच्या एकुण ४ हजार बाटल्या विक्री करण्यासाठी बेकायदेशिर पणे कब्जात बाळगून साठा केलेला आढळून आला. या प्रकरणी पोलिसांनी सिराज राशीद खान वय २९ यास ताब्यात घेतले आहे. सदर साठा हा औषधे या व्याख्येत मोडत असल्याने, या औषधाचा गैरवापर झोप, गुंगी व नशा येण्याकरीता केले जात असल्याने सदर औषध खरेदी विक्री वितरणासाठी औषधे व सौंदय प्रसाधने कायदया अंतर्गत कोणत्याही परवाना नसताना बाळगुन विक्री करण्याकरीता आल्याने सिराज राशीद खान या विरोधात भोईवाडा पोलिस ठाण्यात एनडीपीएस कायदा कलम ८(क), २२(क) सह औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.



**मोबाईल चोरांवर पेल्हार पोलिसांची मोठी कारवाई**

# तीन चोरट्यांना अटक, १३ मोबाईल जप्त, ८ गुन्ह्यांची नोंद

**वसई/प्रतिनिधी**

मोबाईल चोरांवर मोठी कारवाई करत पेल्हार पोलिसांना यश आले आहे. पेल्हार, वालीव आणि नायगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत एकूण ८ गुन्ह्यांची नोंद असलेल्या तीन मोबाईल चोरांना अटक करण्यात आली आहे. त्यापैकी एक आरोपी अल्पवयीन असून अटक करण्यात आलेल्या तिघांकडून पोलिसांनी १३ मोबाईल जप्त केले आहेत. जप्त केलेल्या सर्व मोबाईलची किंमत सुमारे अडीच लाख रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. वास्तविक, ही घटना १७ ऑक्टोबर रोजी पेल्हार पोलीस हद्दीतील मुंबई–अहमदाबाद महामार्गावरील पेल्हार हॉटेलसमोर लाल रंगाच्या पल्सरवरून आलेल्या तीन अज्ञात व्यक्तींनी इम्रान हुसेन लियाकत नावाच्या व्यक्तीच्या हातातील मोबाईल जबरदस्तीने हिसकावून नेल्याची घटना घडली होती. हुसेन शेख आणि पळून गेला. ज्याची फिर्याद इम्रान हुसेन शेख यांनी पेल्हार पोलीस ठाण्यात दिली. त्यानंतर पेल्हार पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक वसंत लबडे यांनी तपास शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक सोपान पाटील यांच्याकडे प्रकरण सोपवले. या प्रकरणाची दखल घेत सोपान पाटील यांनी ४ पथके तयार करून स्वतः घटनास्थळी पोहोचून तत्काळ तपास सुरू केला. या तपासणीदरम्यान एकूण ४० सीसीटीव्ही स्कॅन करण्यात आले. लाल रंगाच्या पल्सर १२५ चा फोटो आणि त्याचा नोंदणी क्रमांक पोलिसांना सापडला. त्यानंतर गोपनीय माहितीनुसार आरोपी नालासोपारा गेटवरून मुंबईच्या दिशेने जात असल्याची खबर मिळताच डिटेक्शन ब्रँचच्या पथकाने त्यांचा पाठलाग करून तिघा आरोपींना तुंगारेश्वर गेटवर अटक केली. त्यांच्याकडून एकूण १३ मोबाईल जप्त करण्यात आले आहेत. ज्याची किंमत सुमारे अडीच लाख रुपये असल्याचे सांगण्यात आले. त्यांच्याविरुद्ध पेल्हार पोलीस ठाण्यात चार, वालीव पोलीस ठाण्यात तीन आणि नायगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक असे एकूण आठ गुन्हे दाखल आहेत.



# सोलापूर-तुळजापूर रोडवर दोन धाब्यांवर छापे; सवा लाखाची देशी-विदेशी दारु जप्त



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

राज्य उत्पादन शुल्क विभागाने शुक्रवारी सोलापूर-तुळजापुर महामार्गावरील उळे गावाच्या हद्दीतील दोन धाब्यांवर धाडी टाकून एक लाख एकवीस हजार दोनशे साठ किंमतीची देशी-विदेशी दारु जप्त केली आहे.

सविस्तर वृत्त असे की, कोजागिरी पौर्णिमेनिमित्त जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या आदेशान्वये सोलापूर-तुळजापूर महामार्गावरील देशी-विदेशी दारु दुकाने २७ व २८ ऑक्टोबर रोजी बंद ठेवण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक नितिन धार्मिक यांनी निरिक्षक ब विभाग व भरारी पथकासमवेत शुक्रवारी दुपारच्या सुमारास सोलापूर-तुळजापूर महामार्गावरील होटेल धाब्यांची तपासणी केली. या तपासणीदरम्यान उळे गावाच्या हद्दीतील भारत पेट्रोल पंपाच्या बाजूला असलेल्या होटेल कांचा येथे धाड टाकली असता त्या ठिकाणी देशी दारू टँगो पंचच्या ९० मिलीच्या ४० बाटल्या, विदेशी मद्याच्या १८० मिलीच्या वेगवेगळ्या ब्रँडच्या ३१९ बाटल्या व बीअरच्या ६५० मिलीच्या ५१ बाटल्या असा एकूण ६२ हजार २७० रुपये किंमतीचा साठा जप्त करण्यात आला. या गुन्ह्यात विकी नारायण गायकवाड, वय २८ वर्षे व आदर्श नारायण गायकवाड, वय २४ वर्षे या इसमांना अटक करण्यात आली. दुसऱ्या कारवाईत भरारी पथकाने सोलापूर-तुळजापूर हायवेवरिल उळे गावाच्या हद्दीतील स्वरुपा चाईनीज सेंटर येथे छापा टाकून त्या ठिकाणाहून देशी दारु टँगो पंचच्या ९० मिलीच्या २०० बाटल्या, विदेशी मद्याच्या वेगवेगळ्या ब्रँडच्या १८० मिलीच्या १७४ व ९० मिलीच्या ८० बाटल्या व बीअरच्या ६५० मिलीच्या ८८ बाटल्या असा एकूण ५८ हजार ९९० रुपये किंमतीचा साठा जप्त करण्यात आला असून शशिकांत दिगंबर शिंदे, वय ३३ वर्षे या इसमाला अटक करण्यात आली. सर्व आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ही कारवाई अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर नितीन धार्मिक यांच्या नेतृत्वाखाली निरीक्षक ब विभाग सदानंद मस्करे, प्रभारी निरीक्षक सुरेश झगडे, दुय्यम निरीक्षक शिवकुमार कांबळे, सहाय्यक दुय्यम निरीक्षक गजानन होळकर, जवान अनिल पांढरे, अशोक माळी, अण्णा कर्चे, प्रविण पुसावळे, वाहनचालक रशिद शेख, दीपक वाघमारे व संजय नवले यांनी पार पाडली. दरम्यान राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून विशेष पथक नेमण्यात आली असून अवैध दारु विक्री, निर्मिती, वाहतुकीवर सातत्याने कारवाया केल्या जात आहेत. तसेच सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही ठिकाणी अवैध हातभट्टी दारु निर्मिती, वाहतूक, विक्री, साठा, बनावट दारु, परराज्यातील दारु याबाबत माहिती मिळाल्यास या विभागास संपर्क साधावा.

# बाणूर यांच्या बदलीसाठी उपोषण करण्याचा इशारा

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागातील लिपिक संजय बाणूर यांची सांगली, सातारा किंवा अहमदनगर जिल्ह्याच्या सीमेवरील आरोग्य विभागात बदली करावी अशी मागणी भाजपचे ज्येष्ठ नेते नागेश जोशी यांनी एका निवेदनाद्वारे केली आहे. सदर कर्मचाऱ्यास काही वर्षापूर्वी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने लाच घेत असताना रंगेहात पकडलेले होते. त्यास निलंबन करून त्यांची इतरत्र बदली करणे शासनाचे काम होते परंतु वशिलेबाजीने ते परत सोलापूर जिल्हा परिषदेत पुन्हा रुजू झाले आहेत, असा आरोप जोशी यांनी निवेदनाद्वारे केला आहे. जिल्ह्यातील शिक्षक भारती संघटनेमार्फत त्यांची बदली व्हावी म्हणून जिल्हा परिषदेतील पूनम गेटवर काही दिवसापूर्वी उपोषण करण्यात आले होते. चौकशी करून त्वरित हकालपट्टी करण्याचे वरिष्ठांनी आश्वासन दिले होते. परंतु उपोषण सोडेपर्यंत असे आश्वासन दिले असून अद्याप ते तेथेच कर्तव्य बजावत आहेत. सदर लिपिकाची तात्काळ आरोग्य खात्यात बदली करावी अन्यथा मुंबई येथील आझाद मैदानावर ज्यांनी त्यांच्यासाठी शिफारस पत्र दिले आहे त्यांच्या विरोधात व बाणूर यांच्या विरोधात उपोषण करणार असल्याचा इशारा नागेश जोशी यांनी दिला आहे.




# जुगार अड्ड्यावर छापा; ९ लाखांचा मुद्देमाल जप्त

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

मंगळवेढा तालुक्यातील आंधळगाव येथे जुगार अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकून ९ लाख १२ हजारांचा मुद्देमाल जप्त करून निलेश सिताराम लेंडवे, अमर बाळासाहेब जाधव (आंधळगाव), नवनाथ मुरलीधर खटकाळे (अकोला), विठ्ठल तुकाराम लाड (घोडेश्वर) या चौघांवर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. आंधळगाव ते लक्ष्मी दहिवडीकडे जाणाऱ्या रोडवर नेचर डेअरीच्या बाजूस पत्रा शेडच्या आडोशाला काही लोक जुगार खेळत असल्याची माहिती मंगळवेढा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रणजीत माने यांना मिळताच त्यांनी पोलिसांच्या मदतीने सदर ठिकाणी छापा टाकला. यावेळी १२ हजार ३०० रुपये रोख रक्कम ८ लाख किमतीचा स्कॉर्पिओ गाडी, एक लाखांचा दोन दुचाकी, असा एकूण ९ लाख १२ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. याबाबतची फिर्याद पोलीस अंमलदार प्रमोद साळुंखे यांनी दिल्यावर चौघा आरोपीवर महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२(अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक सूर्यकांत धापटे हे करीत आहेत.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता (विद्युत) यांचे कार्यालय**
**ठाणे विद्युत विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग परिसर,**
**मराठी ग्रंथ संग्रहालयाजवळ, स्टेशन रोड,**
**ठाणे (पश्चिम) पिन कोड-४०० ६०१.**

website : www.mahapwd.gov.in/ Email : elthane.ee@mahapwd.gov.in दूरध्वनी क्र : (०२२) २५३३ ३१४४ / २५३० ४५१४
जा.क्र.काअ/ठाविवि/निविदा-२/४००३ /सन २०२३ दिनांक : २६/१०/२०२३

## ई-निविदा सुचना क्र. २६ सन २०२३-२०२४

**कार्यकारी अभियंता, ठाणे विद्युत विभाग, सा. बां.विभाग, सा.बां.विभाग, ठाणे (पश्चिम), दुरध्वनी क्र. (०२२) २५३३३१४४** यांचेकडून महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडुन खालील कामांकरीता ब-१ नमुन्यातील टक्केवारी दर (Pereentage Rate) निविदा ऑनलाईन प्रणालीव्दारे निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahapwd.gov.in (Pay PWD Online) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तेथुन डाऊनलोड करण्यात यावी. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, ठाणे विद्युत विभाग, सा.बां.विभाग, ठाणे यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. | ठेकेदारांचा वर्ग/इसारा रक्कम/कोरा निविदा शुल्क |
|---|---|---|---|
| ०१ | Est. No. 141129 of 2023-24 Providing Solar On Grid System for Eklavya Model School Premises at kambalgaon , Tal & Dist. Palghar. | रु. ५,६१,४४१.०० | ठेकेदाराचा वर्ग-ड व त्यावरील तसेच अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु. ५६५०/- निविदा शुक्ल रु. ५००/- (+) १८% जीएसटी एकूण रु. ५९०/- |
| ०२. | Est. No. 141136 of 2023-24 Providing Solar On Grid System in Hostel Eklavya Model School at kambalgaon, Tal & Dist. Palghar. | रु. ५,६१,४४१.०० | ठेकेदाराचा वर्ग-ड व त्यावरील तसेच अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु. ५६५०/- निविदा शुक्ल रु. ५००/- (+) १८% जीएसटी एकूण रु. ५९०/- |
| ०३. | Est. No. 141141 of 2023-24 Providing Solar On Grid System in Hostel Eklavya Model School at kambalgaon, Tal & Dist. Palghar. | रु. ५,६१,४२९.०० | ठेकेदाराचा वर्ग-ड व त्यावरील तसेच अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु. ५६५०/- निविदा शुक्ल रु. ५००/- (+) १८% जीएसटी एकूण रु. ५९०/- |
| ०४. | Est. No. 141206 of 2023-24 Providing Renovation to EI in Eklavya Model School (Gronud floor) at kambalgaon, Tal & Dist. Palghar. | रु. ६,०६,९८३.०० | ठेकेदाराचा वर्ग-ड व त्यावरील तसेच अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु. ६१००/- निविदा शुक्ल रु. ५००/- (+) १८% जीएसटी एकूण रु. ५९०/- |
| ०५. | Est. No. 141216 of 2023-24 Providing 9 Mtr Highmast Poles for Eklavya Model School Premises at kambalgaon, Tal & Dist. Palghar. | रु. ५,६०,६८५.०० | ठेकेदाराचा वर्ग-ड व त्यावरील तसेच अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु. ५६५०/- निविदा शुक्ल रु. ५००/- (+) १८% जीएसटी एकूण रु. ५९०/- |
| ०६. | Est. No. 141216 / 2023-24 Providing Renovation to EI in Eklavya Model School Boys Hostel (Gronud floor) at kambalgaon, Tal & Dist. Palghar. | रु. ५,३३,९५६.०० | ठेकेदाराचा वर्ग-ड व त्यावरील तसेच अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु. ५३५०/- निविदा शुक्ल रु. ५००/- (+) १८% जीएसटी एकूण रु. ५९०/- |
| ०७. | Est. No. 141248 / 2023-24 Providing EI in Govt. Laboratory in Chawl No.2 at Manor, Tal & Dist. Palghar. | रु. ४,२०,३२४.०० | ठेकेदाराचा वर्ग-ड व त्यावरील तसेच अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु. ४२५०/- निविदा शुक्ल रु. ५००/- (+) १८% जीएसटी एकूण रु. ५९०/- |
| ०८. | Est. No. 141263 / 2023-24 Providing Renovation to EI in Eklavya Model School (First floor) at kambalgaon, Tal & District - Palghar. | रु. ६,१७,५२२.०० | ठेकेदाराचा वर्ग-ड व त्यावरील तसेच अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु. ६२००/- निविदा शुक्ल रु. ५००/- (+) १८% जीएसटी एकूण रु. ५९०/- |
| ०९. | Est. No. 141331/ 2023-24 Providing Renovation to EI in Eklavya Model School Boys Hostel (First floor) at kambalgaon, Tal & Dist. Palghar. | रु. ५,१३,२७९.०० | ठेकेदाराचा वर्ग-ड व त्यावरील तसेच अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. इसारा रक्कम रु. ५१५०/- निविदा शुक्ल रु. ५००/- (+) १८% जीएसटी एकूण रु. ५९०/- |

ई-निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक ०३/११/२०२३ रोजी सकाळी १०.०० पासून ते दिनांक १७/११/२०२३ रोजी संध्याकाळी ०६.०० पर्यंत.
ई-निविदा उघडणे : दिनांक २१/११/२०२३ रोजी दुपारी ०३.०० वाजता.

१) https://mahapwd.gov.in (Pay PWD Online) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)
२) कामाच्या करारानाम्यात पोस्ट क्वालीफिकेशन क्रायटेरिया समाविष्ट केलेला आहे.
३) कार्यकारी अभियंता, ठाणे विद्युत विभाग, ठाणे, कार्यालयातील सूचना फलक.

सही/-
**(सं. रा. पुजारी)**
कार्यकारी अभियंता (विघुत)
ठाणे विघुत विभाग, सा.बां.विभाग, ठाणे

**जिमाका/पालघर/ जाहि ११८/५०६/२०२३ दिनांक : २७/१०/२०२३**

# लातूर येथे नवदुर्गाचा सन्मान कार्यक्रम उत्साहात



**लातूर/प्रतिनिधी**

लातूर येथे नवरात्री निमित्ताने कनकधारा चॅरीटेबलं ट्रस्ट लातूर व तनिष्क गोल्ड शोरूमच्या संयुक्त विद्यमाने नवदुर्गाचा सन्मान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये लातूर शहरातील विविध क्षेत्रातील डॉक्टर इंजिनिअर प्राध्यापक टीचर सरपंच नगरसेविका महिलांना नऊ रुपी दुर्गा समजून त्याचा सत्कार करण्यात आला.

त्यामध्ये भारतातील नामवंत कंपनी तनिष्कचे नवीन डिझाईन लॉन्च करण्यात आले. त्यावेळी तनिष्क गोल्ड शोरूमचे सौ संगीता संजयजी बोरा मॅडम व कनक धारा चॅरीटेबलं ट्रस्टच्या अध्यक्ष श्रीमती प्रिती प्रशांत सोनकरच्या शुभ हस्ते सर्व महिलांना मानचिन्ह म्हूणन सर्टिफिकेट देण्यात आले त्या वेळी श्रीमती स्वाती ताई जाधव पाटील, श्रीमती विध्याताई पाटील, डॉ.ज्योती सूळ मॅडम, श्रीमती प्रिती शाह, सौ. शीतल तांदळे, सौ.कोमल वायचळकर नगर सेविका, श्रीमती शिल्पा खानापुरकर, सौ.पल्लवी ढगे, सौ.उर्मिला ढगे फार्मासिस्ट, सौ.संगीता पतंगे, सौ.आम्रता टाक, उद्योजक डॉ. प्रांजली अडसूळ, प्रिती मिसर, सौ माधुरी माकणीकर मिसेस इंडिया व मिसेस महाराष्ट्र, सौ.प्रीतमताई जाधव, सौ उत्कर्षा भालके यांचा यथोचित सन्मान करून कार्यक्रम पार पडला.

## ताबा सुटल्याने दुचाकी झाडाला आदळून अपघातात तरुणाचा दुर्दैवी मृत्यू

बोर्डी : घोलवड येथून डहाणूमध्ये नोकरीवर जाताना कोसबाड रस्त्यावर दुचाकी ताबा सुटल्याने अपघातात तरुणाचा मृत्यू झाला. दुचाकी झाडाला धडकल्याने त्याला गंभीर दुखापत झाली होती. त्याला तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले, परंतु तत्पूर्वीच त्याचे निधन झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. घोलवड येथील विक्रांत सुधीर भागवत (३२) डहाणू येथील कंपनीत कंत्राटी कामगार म्हणून काम करत होता. तो आई-वडिलांचा एकुलता मुलगा होता. विजयादशमीनिमित्त सकाळी घरातील कामे उरकून तो दुचाकीवरून कोसबाडमार्गे कामावर जात होता. रस्त्यावर वाहनाचा ताबा सुटल्याने दुचाकी झाडाला आदळून जोरदार अपघात झाला. या अपघातात तो गंभीर जखमी झाला होता. त्याला तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले परंतु तत्पूर्वीच त्याचे निधन झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. डहाणू येथील उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. त्याची आई सुनीता भागवत या सेवानिवृत्त शिक्षिका आहेत.

30 OCT TO 05 NOV 2023 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 10/28/2023 10:25 PM Page 1



# गाव बंदी पेक्षा अंधभक्ती बंदी परिणामकारक ठरेल!

मराठा आरक्षणाबाबतचे वास्तव लपवून सरकारकडून मराठा आंदोलकांची जी फसवणूक सुरू आहे त्याला अखेर जरांगे पाटील बळी पडले आणि त्यांच्यावर पुन्हा आमरण उपोषण करण्याची पाळी आली. त्यामुळे भविष्यात सरकारवर किंवा राजकीय पुढाऱ्यांवर विश्वास ठेवायचा की नाही याचा विचार करण्याची वेळ महाराष्ट्रातील साडेबारा कोटी जनतेवर आलेली आहे. जरांगे पाटलाची सरकारने फसवणूक केल्यानंतर मराठा समाज संतापने स्वाभाविक होते, पण या संतापातून पुढाऱ्यांना गावबंदी करण्याचा जो निर्णय घेतला आहे त्याचा काहीही उपयोग होणार नाही. कारण सत्तेतले काही पुढारी निर्लज्जपणे प्रसार माध्यमांसमोर सांगत आहेत की गाव बंदीने आम्हाला काही फरक पडणार नाही आणि त्यांचं खरंच आहे. राजकीय पुढारी हे गेंड्याच्या कातडीचे असतात. त्यामुळे अशा लोकांना गाव बंदी ने काय फरक पडणार आहे. गाव बंदी करून पुढाऱ्यांच्या गाड्या अडवण्यापेक्षा मराठा समाजाने राजकीय पुढाऱ्यांची जी अंधभक्ती सुरू केलेली आहे ती बंद करावी. हा नेता माझा तो नेता माझा असे म्हणत त्यांच्या पाठीमागे फरफटत जाणाऱ्यांनी, आता तरी नीट डोकं वापरून विचार करून काही गोष्टीत निर्णय घ्यायला हवेत. आज मराठा समाजाचे जे तरुण, राजकीय पुढाऱ्यांच्या विरोधात आंदोलन करीत आहेत किंवा पुढाऱ्यांना गावबंदी करीत आहेत तेच तरुण सत्ताधारी आणि विरोधी पक्षातल्या पुढाऱ्यांच्या मागे आतापर्यंत फरफटत जात होते आणि यापुढेही तसेच फरफटत जातील. कारण एखाद्या पुढाऱ्यावर विश्वास टाकताना ते या पुढाऱ्याचे अंध फक्त बनतात. त्यामुळे या पुढाऱ्यांनी किंवा त्याच्या राजकीय पक्षाने समाजाचे वाटोळं केलं तरी जनता म्हणून आम्ही त्यांच्या मागे फडफटत जातो. त्यामुळे या लोकांनी जनतेला गृहीत धरलेले आहे, आम्ही काहीही केलं तरी आमचं काहीच वाकड होणार नाही, याची त्यांना खात्री आहे आणि म्हणूनच ते बिंदास आहेत जर जनतेचा पुढाऱ्यांना धाक असता तर महाराष्ट्रात एवढं मोठं मराठा आंदोलन पेटलेले असताना शिर्डीच्या दौऱ्यावर आलेल्या पंतप्रधानांनी त्या आंदोलनाकडे पाठ फिरवून दिल्लीला माघारी गेले नसते. पंतप्रधानांना किंवा इथल्या राजकीय पुढाऱ्यांना पूर्णपणे ठाऊक आहे की आता आंदोलन करीत असलेले मराठा आंदोलक उद्या जाती धर्माचा विषय घेऊन आपण त्यांच्यासमोर गेलो की त्यांचा राग थंड होईल आणि मग ते मागचं सारं काही विसरतील व पुन्हा आपल्या मागे फडफटत येतील. आज या देशात महागाई बेरोजगारी महिलांवरील अत्याचार यासारखे मूलभूत प्रश्न असताना या प्रश्नांवर आंदोलन करण्याची कोणालाही आवश्यकता वाटत नाही, पण तेच जर धर्माचा विषय घेऊन कुणी रस्त्यावर उतरले असते, तर लाखो लोक त्याच्या मागे धावले असते. आजही मराठा आरक्षणासाठी आंदोलन सुरू आहे. त्या आंदोलनात आरक्षण मिळण्याचा भाग आणि आवश्यकता यांच्यापेक्षा मराठा म्हणून एकत्र येण्याची भावना अधिक आहे आणि हे एक प्रकारचे मराठा समाजाचे शक्ती प्रदर्शन आहे. अर्थात लोकशाहीत कुठल्याही प्रश्नावर कोणत्याही समाजाला आंदोलन करण्याचा पूर्ण अधिकार आहे. मराठा आरक्षणाचा प्रश्न मराठा समाजातील लोकांनी नाही, तर इथल्या राजकीय पुढाऱ्यांनी कॉम्प्लिकेटेड केलेला आहे. या पुढाऱ्यांना पक्क माहिती आहे की मराठा समाज आर्थिक दृष्ट्या सक्षम असल्यामुळे या समाजाला आरक्षण मिळू शकत नाही. तरीसुद्धा तात्कालीन काँग्रेस राष्ट्रवादी सरकारने मराठा समाजाला रोजगार आणि शैक्षणिक क्षेत्रात १६% आरक्षण दिले. हे आरक्षण कायद्याच्या कसोटीवर टिकेल की नाही याचा जराही विचार केला नाही. केवळ महाराष्ट्रात मोठ्या संख्येने असलेल्या मराठा समाजाची मते मिळवण्यासाठी मराठा आरक्षणाचा घाट घालण्यात आला आणि त्यानंतर समाजालाही वाटले की होय आम्हालाही आरक्षण मिळायला पाहिजे. कारण मराठ्यांना आरक्षण मिळावं यासाठी त्यांना भडकवणारे हेच राजकीय पुढारी होते. पण आता मराठा आरक्षणाची लढाई न्यायालयात हरल्यानंतर मराठा आरक्षण हे प्रत्येक सरकारच्या अवघड जागेवरच दुखणं झालेल आहे. कारण मराठ्यांना आरक्षण मिळू शकत नाही हे वास्तव सांगण्याची हिंमत कुठल्याही राजकीय पक्षाच्या पुढाऱ्यामध्ये नाही. कारण तसं त्यांनी करण्याचा प्रयत्न केला, तर लोक त्यांना घरात घुसून मारतील. पण आता जो प्रश्न त्यांनी स्वतः निर्माण केलाय तो त्यांना सोडवायचा आहे, पण तो सुटत नसल्यामुळे त्यांनी नेहमीची ट्रिक वापरायला सुरुवात केली आहे ती म्हणजे मराठा आरक्षणाचां मुद्द्यावर चालढकल करणे. पण हे फार काळ चालू शकणार नाही. कारण लोकसभा आणि विधानसभेची निवडणूक तोंडावर आहे सर मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडवण्यात महाराष्ट्र सरकारला अपयश आले, तर त्यांचं काही खर नाही. म्हणूनच मराठा आरक्षणाच्या बाबतीत मराठा समाजाला फसवणाऱ्या सर्वच राजकीय पक्षांच्या पुढाऱ्यांच्या विरोधात निर्णायक भूमिका घेण्याची वेळ आलेली आहे आणि ही निर्णायक भूमिका म्हणजे वेगवेगळ्या पक्षातील मराठा कार्यकर्त्यांनी त्यांच्या राजकीय नेत्याची गुलामगिरी किंवा अंधभक्ती म्हणा करण्याचे सोडून द्यावे, ज्या दिवशी त्यांच्या मागे फरफटत जाणाऱ्या कार्यकर्त्यांची संख्या कमी होईल आणि हेच कार्यकर्ते निवडणुकीत त्यांना आडवे करतील, तेव्हा त्यांना जनतेची ताकद काय असते ते कळेल म्हणूनच गाव बंदी सारखा थातूरमातूर पर्याय शोधून विनाकारण गावांच्या सीमेवर कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करण्यापेक्षा तसेच गावकरी आणि पोलीस यांच्यात विनाकारण वितुष्ट आणण्यापेक्षा अंधभक्ती बंद करा पुढाऱ्यांच्या मागे फरपटत जाणाऱ्या मराठा कार्यकर्त्यांनो पुढाऱ्यांची अंधभक्ती बंद करा जो वेळ या नेत्यांना किंवा त्यांच्या राजकीय पक्षांना देताय तेवढाच वेळ आपल्या कुटुंबासाठी कामधंदा करण्यात जर दिलात, तर कुटुंबाचं भलं होईल आणि कुटुंबासह सुखा समाधानाने जगता येईल. पुन्हा एकदा एक गोष्ट सांगावीशी वाटते ती म्हणजे मराठा आरक्षण मिळणे खूप कठीण आहे, मुख्यमंत्र्यांनी शिवाजी महाराजां समोर खोटी शपथ घेण्यापेक्षा मराठा समाजाला जे वास्तव आहे ते सांगण्याचं धाडस दाखवावं त्यातच त्यांचं आणि समाजाचं भलं आहे.

# जमिनीत कमी ओलावा, रब्बी हंगाम संकटात; देवणी तालुक्यात पेरणी क्षेत्र घटण्याचे छायाचित्र!



**देवणी/प्रतिनिधी**

मान्सूनचा पाऊस वेळेत न पडल्यामुळे देवणी तालुक्यातील खरीप पिकाला फटका बसला असून,त्यात अपुरा पाणीसाठा आणि तीव्र ऑक्टोबर हिटमुळे जमिनीतील ओलावा वेगाने कमी होत आहे. त्यामुळे खरीप हंगाम अंतिम टप्प्यात असतानाच जमिनी कोरड्या पडू लागल्या आहेत. जलाशयांमधील कमी पाणीसाठ्यामुळे संरक्षित सिंचनाच्या समस्या वाढल्या आहेत. परिणामी देवणी तालुक्यातील रब्बी हंगाम संकटात येण्याची चिन्हे दिसून येत आहेत.देवणी तालुक्यात चालू वर्षी खरीप हंगामात पाऊस वेळेवर पडला नाही. त्यामुळे खरीप हंगाम लांबला. कोरडवाहू पेरणी क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात घट झाली. त्यामुळे येणारा रब्बी हंगाम जमिनीत कमी ओलावा असल्याने संकटात येतो की काय, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. दरम्यान यंदा अपेक्षित न पडलेला पाऊस जलसाठ्यांची दयनीय अवस्था, उपशावर असलेल्या विहिरी, बोअरवेल आणि ओलावा नसलेल्या जमिनी यामुळे देवणी तालुक्यातील यंदाच्या रब्बीची वाट अवघडच आहे. एखादा अवकाळी पाऊस जर झाला नाही तर रब्बी पिकाच्या पेरणी सोबतच फळबागांवर संकटाची कुऱ्हाड पुन्हा एकदा कोसळणार आहे. मान्सून परतल्यानंतर तालुक्याच्या बहुतांश भागात उष्ण आणि कोरडे हवामान झाले आहे. हस्त नक्षत्राचा तालुक्यात बऱ्यापैकी पाऊस बरसला मात्र आता स्वाती नक्षत्रात पाऊस पडण्याची अपेक्षा आहे. मात्र सध्या तरी ही परिस्थिती नसल्याचे चित्र आहे. ऑक्टोबर हिटचा चटका वाढल्याने तालुक्यात उन्हाची ताप वाढली आहे. अंशतः ढगाळ हवामानामुळे उकाडा कायम आहे.

**गहू, हरभरा क्षेत्र घटण्याची दाट शक्यता!**

मुळातच चालू वर्षी कमी प्रमाणात पाऊस बरसला, त्यामुळे भूपृष्ठावरील सिंचन स्रोत्र नाही. पुरेसे पाणी नाही दुसरीकडे वाढते तापमान जमिनीतील ओलावा नाहीसा करत आहे. तापमान आतापासूनच ३५ओ सी च्या पुढे जात आहे. त्यामुळे जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होतो आहे. परिणामी यंदा रब्बी हंगामातील गहू, हरभरा क्षेत्र घटण्याची दाट शक्यता आहे. तालुक्यात कमी पाण्यात येणाऱ्या रब्बी ज्वारीचा पेरा करण्याशिवाय पर्याय नसून हे पीक देखील कितपत हाती लागते याविषयी शेतकऱ्यांत शंका आहे.

**शेतकऱ्यांची चिंता वाढली!**

वास्तविक चालू वर्षीचा रब्बी हंगाम शेतकऱ्यांच्या दृष्टीने हा कठीण आहे. पाण्याच्या खोल चाललेल्या पाणी पातळीने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. त्याचा परिणाम आता रब्बीच्या पेरण्यांवरही होऊ पाहत आहे. पावसाअभावी पुरेशा प्रमाणात जमिनीत ओल नसल्याने रब्बी हंगामातील काही भागातील पेरण्या देखील रखडल्या आहेत.

# शिंदे गटाच्या माजी नगरसेवकाची भाजप कार्यकर्त्याला बेदम मारहाण, आरोपी मोकाट, भाजप कार्यकर्ते थेट फडणवीसांकडे!

**कल्याण/प्रतिनिधी**

भाजप कार्यकत्यांबाबत पोलीस दूजाभाव केला जात असल्याचं गाऱ्हाणं उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर भाजपचे कल्याण जिल्हाध्यक्ष नाना सूर्यवंशी यांनी मांडलं. फडणवीस आज कल्याण पूर्वेत आमदार गणपत गायकवाड यांची भेट घेण्यासाठी आले होते. यावेळी भाजप पदाधिकारी यांनी उपमुख्यमंत्र्यांची भेट घेतली. शिंदे गटाचे माजी नगरसेवक दुर्योधन पाटील यांनी वैभव पाटील आणि पंकज पाटील यांच्यासह २२ ऑक्टोबर रोजी भाजप कार्यकर्ता मनोहर पाटील आणि त्याचा मित्र कमलाकर पाटील या दोघांना पिस्तूल काढून शिवीगाळ आणि दमदाटी करत मारहाण केल्याचा आरोप आहे. याबाबत खडकपाडा पोलिस स्थानकात गुन्हा दाखल केला आहे. मात्र आरोपी अद्याप मोकाट अआहेत तसेच त्यांना अटकही केली जात नसल्याने कल्याणमधील भाजपच्या नेतेमंडळी आणि पदाधिकारी यांनी उपमुख्यमंत्री यांची भेट घेतली आहे. २२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडे चारच्या सुमारास कल्याण जवळील वडवली गावात मनोहर पाटील आणि त्याचा मित्र कामाची पाहणी करत होते. यावेळी वडवली गावातील दुर्योधन पाटील, वैभव पाटील, पंकज पाटील सदर ठिकाणी आले. त्या तिघांनी मनोहर आणि मित्र कमलाकर पाटील यांना शिवीगाळ केली आणि म्हणाले की तुम्ही आमच्या गावात काम कसे करता ? तुम्हाला कोणी काम दिले? तुम्ही या ठिकाणी कसे काम करता? तुम्हाला मी दाखवतोच... असे बोलुन त्याने थेट पिस्तुल काढून दमदाटी केल्याचा आरोप आहे. यावेळी मनोहर याने समजाविण्याचा प्रयत्न केला. सदरचे



काम हे फक्त रस्त्यापुरतेच आहे. आम्ही कोणतेही काम घेतलेले नाही, असे सांगत असताना कमलाकर पाटील यांनी देखील त्यांना समजविण्याचा प्रयत्न केला. मात्र वैभव व पंकज यांनी कमलाकर पाटील यास लाथाबुक्यांनी मारहाण केल. तुम्ही कसे काम करता तेच आम्ही बघतो अशी दमदाटीही केली. तसेच वैभव पाटील याने त्याच्याकडील तलवार काढून मनोहरच्या डोक्यात मारली. त्यामुळे त्याच्या डोक्यात जखम होवून रक्तस्राव होऊ लागला. त्याचवेळी दुर्योधन पाटील याने त्याच्या जवळील पिस्तुल उजव्या कानावर मारली. त्यावेळी पंकजने देखील मारहाण केल्याचा आरोप आहे. दरम्यान याप्रकरणी खडकपाडा पोलिस स्थानकात दुर्योधन पाटील, वैभव पाटील आणि पंकज पाटील यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

# औसातील श्री कालिकादेवी मातेची वैंशाली देशमुख यांच्या हस्ते आरती

**लातूर/प्रतिनिधी**

शहरातील जुना औसा रोड परिसरातील सद्गुरुनगरमधील श्री कालिकादेवी मंदीरातील श्री कालिकादेवी मातेची आरती विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांच्या हस्ते पारंपरीक पध्दतीने करण्यात आली. सद्गुरुनगरमध्ये श्री कालिकादेवी मातेचे मंदीर आहे. सर्व भाविक, भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या या मंदीरातील श्री



कालिकादेवी मातेची आरती विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांच्या हस्ते दि. १९ ऑक्टोबर रोजी रात्री ८.३० वाजता करण्यात आली. यावेळी डॉ. सारिका देशमुख, सौ. जुईली गणेश देशमुख, गणेश एस. आर. देशमुख, माजी नगरसेवक राम कोंबडे, सौ. प्रज्ञा राम कोंबडे, मंदीर समितीचे दीपक दिक्षीत, मुरलीधर दिक्षीत, प्रा.श्रीहरी वेदपाठक, अमोल दैठणकर, प्रदीप अपचुंदेकर, विवेक पंडित, प्रकाश महामुनी, अरुण बारस्कर, शशीकांत खर्डेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. श्री कालिकादेवी मातेच्या आरतीनंतर विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांच्यासह सर्व पाहूण्यांचे अमृता दैठणकर, सरीता दिक्षीत, प्रतिभा अपचुंदेकर, मीना बारस्कर, रवी पोतदार, अमोल दैठणकर यांनी स्वागत केले. यावेळी बोलताना विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांनी सर्व भाविक, भक्तांना शारदीय नवरात्र महोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच मंदीर विकासासंदर्भात जे काही काम असेल ती सर्व कामे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख पुर्ण करतील, ते सदैव आपल्या सोबत आहेत. आपणही त्यांना कायम आशिर्वाद द्यावे, असे नमुद केले. यावेळी लातूर जिल्हा सोनार समाज, माता कल्याणी नवरात्र महोत्सव मंडळाच्या वतीनेही विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांचा सत्कार करण्यात आला. सुत्रसंचालन प्रा. श्रीहरी वेदपाठक यांनी केले. यावेळी भाविक, भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या भिवंडी लोकसभा दौऱ्यास उस्फुर्त प्रतिसाद

**भिवंडी/प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाने लोकसभा निवडणुकी साठी कंबर कसली असून लोकसभा मतदारसंघ निहाय महाविजय २०२४ संकल्प दौरा कार्यक्रम राबविला जात आहे.त्यामध्ये भाजपा प्रदेशा अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे शनिवारी भिवंडी लोकसभा मतदारसंघात दाखल झाले. काल्हेर येथे युवा मोर्चा उपाध्यक्ष देवेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली भाजपा युवा मोर्चा वतीने भव्य स्वागत करण्यात आले. त्यानंतर शहरातील पद्मानगर



भाजी मार्केट येथील भाजी व फळ विक्रेते, किराणा दुकानदार, उज्वला गॅस योजना, नाका कामगार, आयुष्यमान भारत, स्वनिधी लाभार्थी,मोफत धान्य मिळणारे लाभार्थी यांच्याशी संवाद साधत त्यांना २०२४ मध्ये प्रधानमंत्री कोण हवेत याची विचारणा केली. या संवाद यात्रेत केंद्रीय पंचायतीराज राज्यमंत्री कपिल पाटील, आमदार महेश चौघुले, प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक,विक्रांत पाटील, युवा मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष देवेश पाटील, शहराध्यक्ष अँड हर्षल पाटील, ठाणे ग्रामीण जिल्हा अध्यक्ष मधुकर मोहपे, भिवंडी पूर्व विधानसभा निवडणूक प्रमुख संतोष शेट्टी आदी पदाधिकारी सहभागी झाले होते. या संवाद यात्रेचा समारोप पद्मानगर संतोष शेट्टी यांच्या जनसंपर्क कार्यालया बाहेर झालेल्या सभेत चंद्रशेखर बावनकुळे यांनी इंडिया आघाडीवर घणाघात करीत राज्यात मोदी यांच्या नेतृत्वाला भरघोस प्रतिसाद मिळत असून त्यामध्ये भिवंडी लोकसभे मधील संवाद यात्रा ही २३ वी आहे असे सांगत भिवंडीत ८१४ तर राज्यात तब्बल ३५ हजार नागरिकांशी संवाद साधला त्या मध्ये फक्त १३ जणांनी मोदी व्यतिरिक्त इतर व्यक्तीचे नाव घेतले अशी माहिती दिली. काँग्रेसच्या ६५ वर्षाचे पाप मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने धुवून काढले असे सांगत देशाला विश्वात महसत्ता बनविण्या साठी २०२४ मध्ये महाराष्ट्रात ४५ प्लस खासदार निवडून देण्याचे आवाहन चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेवटी केले. तर या प्रसंगी केंद्रीय पंचायती राज राज्यमंत्री कपिल पाटील यांनी अयोध्या येथील रामजन्मभूमी मंदिर दर्शनासाठी भिवंडी लोकसभा क्षेत्रातील ५० हजार नागरिकांना घेवून जाण्याचा संकल्प बोलून दाखविला.

# कुष्ठरोग्यांना तपासणी व उपचारासाठी प्रवृत्त करावे; आरोग्य सेवा आयुक्त धीरज कुमार यांचे आवाहन

**मुंबई/प्रतिनिधी**

राज्यात घरोघरी सर्वेक्षण करून, कुष्ठरुग्ण शोध अभियान व सक्रीय क्षयरोग शोध मोहीम काटेकोरपणे राबवावी. शोध अभियाना दरम्यान नागरिकांचे या आजाराबाबतचे गैरसमज दूर करावे. नागरिकांना हा आजार बरा होण्याचा विश्वास देवून तपासणी व उपचारासाठी प्रवृत्त करावे, असे राज्याचे आरोग्य सेवा आयुक्त धीरज कुमार यांनी सांगितले. राज्यात २० नोव्हेंबर ते ०६ डिसेंबर



२०२३ या कालावधीत आरोग्य विभागाच्या वतीने, केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनेनुसार कुष्ठरुग्ण शोध अभियान व सक्रीय क्षयरोग शोध मोहीम राबविण्यात येत आहे. याबाबत आयोजित बैठकीत ते बोलत होते. सामाजिक कारणाने कुष्ठरोग लपवण्याकडे लोकांचा, विशेषतः महिलांचा कल असल्याचे सांगत आयुक्त श्री. कुमार म्हणाले, आरोग्य विभागाने सोशल मिडिया, सामाजिक संस्था व इतर माध्यमाद्वारे लोकांचे प्रबोधन करून, योग्य उपचाराने हा आजार बरा होतो असा विश्वास निर्माण करावा.जास्तीतजास्त संशयित रुग्णांची तपासणी करावी.या मोहिमेसाठी स्थानिक जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे सहकार्य व मार्गदर्शन घ्यावे, अशा सूचनाही आयुक्तांनी यावेळी दिल्या. पंतप्रधान व राज्याचे आरोग्य मंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली सन २०२७ पर्यंत शून्य कुष्ठरोग प्रसाराचे ध्येय गाठण्यासाठी सर्वांनी कटिबद्ध व्हावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. २० नोव्हेंबर ते ०६ डिसेंबर २०२३ या कालावधीत होणाऱ्या संयुक्त कुष्ठरोग व सक्रीय क्षयरोग शोध मोहिमेसाठी राज्यभरात ६५,८३३ पथके तयार करण्यात आलेली आहेत. एक पथक एका दिवसात शहरी भागातील २५ आणि ग्रामीण भागातील २० घरांना भेटी देणार आहे. गृहभेटी अंतर्गत राज्यातील १ कोटी ७५ लाख घरांचे सर्वेक्षण केले जाणार असून, अंदाजे ८ कोटी ६६ लाख लोकसंख्येचे सर्वेक्षण होईल, अशी माहिती आरोग्य विभागाच्या सहसंचालक डॉ. सुनिता गोल्हाईत यांनी यावेळी दिली. नागरिकांनी आरोग्य विभागाच्या सर्वेक्षणाला सहकार्य करण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : अॅड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

क्राईम संध्या | सोमवार दि. ३० ऑक्टोबर २०२३ ते रविवार दि. ०५ नोव्हेंबर २०२३ | लातूर/पालघर/सोलापूर | www.crimesandhya.com | ५

# विविध मागण्यांसाठी वाडा तालुका आदिवासी संघर्ष समितीचा भव्य मोर्चा



**वाडा/प्रतिनिधी**

आदिवासी, शेतमजूर, शेतकरी, स्थानिक भूमिपुत्र यांना आपल्या जागा जमिनी व व्यवसायापासून बेदखल करुन त्यांना हद्दपार करण्याचे धोरण सरकारने आखले आहे. भारतीय संविधानाने सर्वसामान्य व तळागाळातील सर्वसामान्य लोकांना समान अधिकार दिले असतांना शासन आपले मनमानी धोरण राबविण्याचा प्रयत्न करीत आहे. आज न्यायव्यवस्थेवर लोकांचा विश्वास कमी होत चालला आहे. अनेक जाती-जमातींमध्ये वेगवेगळ्या पद्धतीच्या माध्यमातून समाजा समाजामध्ये वेग-वेगळ्या जातीधर्माच्या नांवाने आरक्षणाचे मुद्दे घेऊन आपापसांत भांडणे लावली जात आहेत. या सर्व शासनाच्या मनमानी धोरणाप्रमाणे लोकांच्या विरोधात कायदे करण्याचा शासन भडीमार करीत आहे. जो कायदा सर्वसामान्य लोकांच्या हिताचा असणे आवश्यक असतांना मुठभर धनदांडग्या लोकांच्या हितासाठी त्या कायद्यामध्ये बदल केला जात आहे. याचा निषेध करण्यासाठी वाडा तालुका आदिवासी संघर्ष समितीच्या वतीने बुधवारी (दि.२५) खंडेश्वरीनाका येथे रास्ता रोको करून तहसील कारयालयावर धडक मोर्चा काढण्यात करण्यात आला. धनगर (धनगड) समाजाला आदिवासी समाजाच्या कोट्यातून आरक्षण देण्यात येऊ नये. पेसा भरती त्वरीत अंमलबजावणी करावी. महाराष्ट्र शासनाने ६ सप्टेंबर २०२३ चा कंत्राटी नोकर भरती करण्यासाठी काढलेला शासन निर्णय त्वरीत रद्द करणे. महाराष्ट्र राज्यातील ६२००० सरकारी शाळांचे खाजगीकरण पूर्णपणे बंद करा. दि. ६ जुलै २०१७ च्या सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालांचा सन्मान राखून १७ पदांची सरकारी नोकरभरती त्वरीत करणे. बोगस आदिवासींची चौकशी करुन तात्काळ निलंबन करावे. भूमिहीन कुटूंबाच्या घराखालील जागा त्वरीत त्या कुटूंबाच्या नांवे करणे. भूमिहीन आदिवासी कुटूंबाला ५ एकर जागा जमिन त्वरीत वाटप करणे. वनदावे आदिवासींच्या नांवे करणे. न नोंदविलेल्या कुळांची पिक पाहणी सदरी नोंद करण्यात यावी. पेसा कायद्याची अंमलबजावणी त्वरीत करावी. बिंदुनामावलीची अंमलबजावणी त्वरीत करावी. एमएसईबीचा भोंगळ कारभार थांबवून जनतेला न्याय द्यावा. तसेच खोटी बिले आकारणी त्वरीत थांबवावी.अशा विविध मागण्या घेऊन आदिवासी संघर्ष समितीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी तहसील कार्यालयाला धडक दिली. एक तीर एक कमान, खरे आदिवासी एक समान, आरक्षण आमच्या हक्काचे नाही कुणाचे बापाचे, आदिवासी बांधव जागा हो, संघर्षाचा धागा हो. आदिवासी एकतेचा विजय असो. अशा विविध घोषणांनी शहर दुमधुमले होते.याप्रसंगी संतोष साठे, अनंता वनगा, मृणाली नडगे, पूजा चव्हाण, अर्चना भोईर, बाळा बराठे, यतीन राऊत, योगेश गवा, भास्कर दळवी, सुरेश पवार राजू दळवी यांच्यासह भास्कर दळवी यांनी मोर्चे कऱ्यांना मार्गदर्शन केले. शेवटी तहसीलदार भाऊसाहेब अंधारे व पोलीस निरीक्षक सुरेश कदम यांनी व्यासपीठावर येऊन मोर्चे कऱ्यांचे निवेदन स्वीकारून पुढील कारवाईसाठी निवेदन वरिष्ठ्यांना पाठविण्याचे आश्वासन तहसीलदार अंधारे यांनी दिले. पोलीस अधीक्षक बाळासाहेबा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उप्पर पोलीस अधीक्षक पंकज शिरसाट, उपविभागीय अधिकारी शैलेश काळे हे स्वतः वाड्यात हजर राहून मोर्चावर नियंत्रण ठेवले. पोलीस निरीक्षक सुरेश कदम यांच्यासह इतर दहा अधिकरी, ६५ पोलीस कर्मचारी, २० वाहतूक निरीक्षक, २२ होमगार्ड, १० स्ट्राईकिंग असा मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मोर्चा दरम्यान कुठलाही अनुचित प्रकार घडला नाही.

# भिवंडीत धोकादाय इमारत दुर्घटनेस अनेक वेळा तळमजल्या वरील यंत्रमाग कारखाने जबाबदार!



**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी शहरात इमारत दुर्घटना हा काही नवीन मुद्दा राहिलेला नाही परंतु बऱ्याच वेळा झालेला दुर्घटनांमध्ये इमारतींच्या तळ मजल्यावर असलेले यंत्रमाग कारखाने हे जबाबदार ठरत आहेत, असे असताना अनेक धोकादायक इमारतींवर पालिका प्रशासन कारवाई करीत नसल्याने अनेकांचा जीव धोक्यात आला आहे. मागील महिन्यात तीन सप्टेंबर रोजी साहिल हॉटेल परिसरात झालेल्या इमारत दुर्घटनेत दोघा जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. त्या दुर्घटनेस इमारतीच्या तळमजल्यावर असलेल्या यंत्रमाग कारखान्या मुळे इमारत खिळखिळी होऊन दुर्घटन घडल्याचा प्राथमिक अंदाज काढण्यात आला. तर त्यापूर्वी सुध्दा जीलानी इमारत दुर्घटना व इतर इमारत दुर्घटना या ठिकाणी सुध्दा यंत्रमाग कारखाने होते हे विशेष. अशा परिस्थितीत पालिका प्रशासन अशा धोकादायक इमारतींवर कारवाई करण्यासाठी गांभीर्य बाळगत नसल्याचे प्रकर्षाने जाणवते. भिवंडी शहरात धोकादायक इमारतीं वरील कारवाई मागील काही दिवसात मंदावली असून, अनेक इमारतींच्या मालकी हक हक्का बाबत वाद असल्याने तर अनेक जागे मध्ये पगडी पद्धतीने कारखाने असल्याने जमीन मालक कडून जागा बळकावली जाईल या भीतीपोटी अशा धोकादायक इमारती मधील यंत्रमाग कारखाने खाली केले जात नाहीत पण इमारतींच्या दुर्घटना झाल्यास हकनाक निष्पापाना जीव गमवावा लागतो या कडे पालिका प्रशासन लक्ष देणार कधी असा प्रश्न सर्वसंमत जनता विचारात आहे .

# जि.प.अध्यक्षांमुळे होणार भक्ती हरवटे हिचे स्वप्न पूर्ण!



**पालघर/प्रतिनिधी**

भक्ती अशोक हरवटे, ता. विक्रमगड रा. आंबेघर ही राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा चंद्रपूर येथे १५०० मिटर धावणे या स्पर्धेसाठी पात्र ठरली आहे. परंतु घरची परिस्थिती गरीब असल्यामुळे चंद्रपूर येथे जाऊ शकत नसल्याने भक्तीने जिल्हा परिषद अध्यक्ष यांची त्यांच्या दालनात भेट घेऊन आपली व्यथा व्यक्त केली.

त्यानुसार आज विक्रमगड येथे जिल्हा परिषद अध्यक्ष यांनी दहा हजार रुपयांची आर्थिक मदत केली. त्यांच्या या मदती मुळे मोठा आधार झाला असल्याचे सांगून आपल्याला आता स्पर्धेत सहभागी होता होऊन आपले स्वप्न पूर्ण होणार असल्याचे समाधान भक्ती हिने व्यक्त केले. यावेळी सोबत भक्तीचे कुटुंबीय उपस्थित होते. आर्थिक हातभार लावल्याने जर कुणा खेळाडूची अडचण दूर होऊन त्याचे स्वप्न पूर्ण होत असेल किंवा भविष्य उज्वल होत असेल तर शक्य तिथे नक्कीच मदत करीन असे प्रतिपादन यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम यांनी केले.

# पालघरमधील ड्रग्जच्या कारखान्यावर छापा, कोट्यावधींचे एमडी ड्रग्ज जप्त!





**मिरा-भाईंदर/प्रतिनिधी**

मिरा-भाईंदरमध्ये अमली पदार्थांची विक्री करण्यासाठी आलेल्या अटक आरोपीच्या संपूर्ण साखळीचा तपास करत पालघर जिल्ह्याच्या मोखाड्यात अमली पदार्थांच्या सुरू असलेल्या कारखान्यावर छापा टाकून कारवाई करण्यात आली आहे. एका फार्म हाऊसमध्ये हा कारखाना थाटण्यात आला होता. मिरा-भाईंदर पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या पथकाने ही कारवाई केली असून तब्बल ३८ कोटींचा एमडी येथून जप्त केला आहे. हा कारखाना मागच्या दीड वर्षांपासून सुरू होता. मिरा-भाईंदर मध्ये अमली पदार्थांची विक्री करण्यासाठी काही जण आले असून ते भाईंदर पूर्वेला असणाऱ्या एका हॉटेल मध्ये आठवडाभरापासून वास्तव्यास असल्याची माहिती १८ ऑक्टोबर रोजी गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली होती. त्यानुसार कारवाई केली असता, तेथे २५१ ग्राम एमडी व जिवंत काडतुसे मिळून आल्याने सनी सलेकर, विशाल गोडसे, दीपक दुबे व शहबाज सेवा अश्या चार जणांना अटक करण्यात आली होती. या आरोपींच्या साखळीची माहिती घेण्यासाठी अधिक चौकशी केली असता त्यांनी दहिसर मधील नसीर अहमद चौधरी व भाईंदरच्या गौतम घोष ह्याचा देखील सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना अटक करण्यात आली होती. त्याने दिलेल्या माहितीनुसार वसईतील समीर पिंजारच्या पालघर मधील मोखाडा येथील एका फार्म हाऊसवर पोलिसांकडून नुकताच छापा टाकण्यात आला. येथील प्रयोग शाळेत विविध केमिकलच्या मदतीने अमली (मेफेड्रोन) पदार्थ तयार केले जात असल्याचे दिसून आले. येथून तब्बल १८ किलो एमडी जप्त करण्यात आला असून आंतरराष्ट्रीय बाजारात त्याची ३६ कोटी रुपये इतकी किंमत आहे. हा कारखाना चालवणाऱ्या मुख्य ४५ वर्षीय आरोपी समीरला देखील अटक करण्यात आली आहे. तो, ह्यापूर्वी हैदराबाद मधील एका केमिकल कारखान्यात कामाला होता, येथे त्याने अमली पदार्थ तयार करण्याचे प्रशिक्षण घेतले असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. नाशिकच्या ललित पाटील प्रकरणाशी याचा संबंध आहे का? याचा देखील तपास केला जात असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या अविराज कुराडे यांनी दिली.

# अशोका विजया दशमीनिमित्त प्रवचन पुष्प अर्पण



**वाडा/प्रतिनिधी**

भारतीय बौद्ध महासभा वाडा तालुका शाखेच्या वतीने मारुती रामचंद्र गायकवाड (म्हसवळ - कोंढळे) आणी गायकवाड कुटुंबीय या धम्मबांधवांच्या निमंत्रणातून वर्षावास कार्यक्रमाच्या निमित्ताने, तसेच अशोका विजया दशमी (धम्मचक्र प्रवर्तन दिन) या निमीत्ताने प्रवचन मालिकेचे पुष्प अर्पण करण्यात आले. यावेळी वाडा शाखेचे, हीशोब तपासणीस प्रा. कीरण थोरात आणि वाडा तालुका शाखेच्या महीला सचीव सीमाताई महाले यांनी धम्मचक्र प्रवर्तन दिन या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. तालुका शाखेचे विद्यमान अध्यक्ष विनोद वाघचौरे यांच्या अध्यक्षतेखाली हा धम्म प्रवचनाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी पालघर जिल्हा शाखेचे कोषाध्यक्ष वसंत गायकवाड, महीला जिल्हा संघटक मंदाताई कांबळे, अर्चनाताई जाधव, गवंडी बांधकाम मजुर संघटनेचे अध्यक्ष भिमराव बागुल, सामाजीक कार्यकर्ते विजय बिर्हाडे, एच. बी. माने, रश्मी भोईर (केंद्रीय शिक्षीका) तसेच वाडा तालुका शाखेचे कोषाध्यक्ष सुरेश कांबळे, पर्यटन सचीव कीशोर जाधव, संघटक सुरेश गायकवाड, तालुका समता सैनिक करुणा जाधव, निशा वाघचौरे, सुप्रसिध्द गायक कैलास जाधव (खुपरी), वसंत जाधव (वडवळी), दीपक जाधव (कुडुस), कवीता जाधव (कोने) आदी जिल्हा तसेच तालुका शाखेचे पदाधीकारी उपस्थित होते. तसेच... म्हसवल कोंढळे येथील ग्रामस्थ यामध्ये अनंत गायकवाड, जयवंत गायकवा, चंद्रकांत गायकवाड, रीतेश गायकवाड, नितीन जाधव, देविदास थुळे, प्रणित गायकवाड, प्रथमेश गायकवाड आणि शिलसंपन्न सर्व गायकवाड, थुले कुटुंबातील महीला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते. आलेल्या सर्व जिल्हा, तालुका पदाधिकाऱ्यांचे गायकवाड कुटुंब यांच्याकडुन शाल, पुष्पगुच्छ देवुन स्वागत करण्यात आले, तसेच श्रध्देने सुग्रास असं भोजनदान सुध्दा करण्यात आले. यावेळी, वाडा तालुका शाखेच्या वतीने ऊपस्थीत म्हसवल कोंढळे येथील धम्मबांधवांना बौध्द संस्कार पाठ या पुस्तकांचे वाटप करण्यात आले. प्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अपर्णा गवळी यांनी केले. तर, रितेश गायकवाड यांनी सर्वाचे आभार व्यक्त करुन सरणत्तयाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# कै.रसिका महाविद्यालयात आंतर महाविद्यालयीन बॉडी बिल्डिंग स्पर्धा संपन्न



**देवणी/प्रतिनिधी**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व कै. रसिका महाविद्यालय, देवणी यांच्या संयुक्त विद्यमाने आंतर महाविद्यालयीन बॉडी बिल्डिंग (पुरूष) स्पर्धा आज दिनांक २३ ऑक्टोबर २०२३ रोजी संपन्न झाल्या. या स्पर्धेच्या उद्धाटन व बक्षीस वितरण कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा. गोविंदरावजी भोपणीकर साहेब, उपस्थित होते. उद्घाटक म्हणून श्री.गीते साहेब (पी.आय. देवणी पोलीस स्टेशन) प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.डॉ. दिलीप भडके (निवड समिती अध्यक्ष) प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. शिवाजी सोनटक्के, क्रीडा

## कै. रसिका महाविद्यालयास सर्वसाधारण विजेतेपद

संचालक प्रा. डॉ. सचिन चामले, प्रा. सतीश मुंढे, प्रा.डॉ.दत्ता मुंढे, प्रा. डॉ.शिवानंद पाटील हे उपस्थित होते. या स्पर्धेत ६० किलो वजन गटांमध्ये मरेवार अथर्व प्रथम, कोणाळे सिद्धेश्वर द्वितीय तर ६५ किलो वजन गटामध्ये शेख फरदीन प्रथम, मुर्शिद साहिल द्वितीय तर ७० किलो वजन गटामध्ये कांबळे अरुण-प्रथम, केदासे अभिषेक-द्वितीय तर ७५ किलो वजन गटांमध्ये थोडके अझर प्रथम, ८० किलो गटांमध्ये संमुखराव विशाल-प्रथम तर बिरादार आकाश -द्वितीय यांनी विजय प्राप्त केला आहे. या स्पर्धेत सर्वाधिक बक्षीस मिळवून सर्वसाधारण विजेतेपद कै. रसिका महाविद्यालयाच्या मुलाच्या संघाने पटकावले आहे. या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी व पंच म्हणून प्रा.डॉ. दिलीप भडके, प्रा. सतीश मुंडे, डॉ. दत्ता मुंडे, प्रा.डॉ. शिवानंद पाटील यांनी काम पाहिले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. पुरुषोत्तम मोरे व आभार प्रा. गोपाल सोमाणी यांनी केले.

# वाडा तालुक्यातील ममता लहांगे सीमा सुरक्षा दलात दाखल

**वाडा/प्रतिनिधी**



वाडा तालुक्यातील चंद्रपाडा (कोंढले) येथील कु. ममता लहांगे हिची सीमा सुरक्षा दल (बी.एस.एफ.) मध्ये निवड होऊन ती शुक्रवारी (दि.२७) सैन्य प्रशिक्षणाकरीता गेली आहे. सीमा सुरक्षा दलामध्ये दाखल झालेली वाडा तालुक्यातील पहिली मुलगी असल्याने तिचे कौतुक होत आहे.तर वाडा वासियांसाठी ही अभिमानाची बाब आहे.ममता लहांगे हिने वाड्याते पहिली महिला सैनिक होण्याचा मान मिळवला आहे. विशेष बाब म्हणजे मुंबई पोलिसात निवड होऊन सुद्धा तिने सीमा सुरक्षा दल (बसफ) सारखं सैन्य क्षेत्र निवडलं यावरून तिच्या मनात असलेली देशभक्तीची जाणीव होत आहे. लवकरच यशस्वी सैन्य प्रशिक्षण पूर्ण करून सैन्य सेवेत दाखल होऊन वाडा तालुक्याचे तसेच पालघर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत सेवा करेल याकरीता तीच्यावर प्रत्येक स्तरातून शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

# वाहन चोरांची टोळी पोलिसांनी पकडली; १२ प्रकरणे सोडवली




**वसई/प्रतिनिधी**

मीरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत गेल्या काही वर्षात वाहन चोरीच्या घटना वाढल्या असून त्यामुळे पोलीस विभागात खळबळ उडाली आहे. काही दिवसांपूर्वी तक्रारदार गुलफराज नसीर आलम (वय २६) यांनी त्यांचे वैयक्तिक वाहन क्रमांक एमएच ४८ सीजी ६३७३ ची चोरी झाल्याची तक्रार वालीव पोलीस ठाण्यात दिली होती. प्रकरणाचे गांभीर्य पाहून परिमंडळ २ च्या पोलीस उपायुक्त पौर्णिमा चौघुले शृंगी व तुळींज विभागाचे सहाय्यक आयुक्त विनायक नरले यांनी एक गट तयार केला असून त्यात वालीव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जयराज रणवरे, पोलीस निरीक्षक जिलानी सय्यद (गुन्हे शाखा), सहाय्यक पोलीस उपायुक्त डॉ. निरीक्षक सचिन सानप यांचा समावेश करून मुकेश पवार, मनोज मोरे, किरण महात्रे, सचिन दोरकर, सतीश गांगुर्डे, बाळू कूटे, विनायक राऊत, अभिजीत गाधारी यांना तत्काळ कारवाईचे आदेश दिले.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार पोलिस दलातील अधिकार्यांनी ३ चोरट्या वाहन चोरांच्या टोळीला सापळा रचला त्यात १) शमशुद्दीन अब्दुल रजाक शेख वय २८ वर्षे रा. नायगाव, २) फिरोज अब्दुल रजाक शेख, रा. ३१ वर्षे, रा. विरार, ३) मुस्ताक मुन्ना शेख, वय ३० वर्षे, रा. विरार. नाला सोपारा याला अटक करण्यात आली असून त्याच्याकडे कसून चौकशी केली असता वालीव, पेल्हार, विरार येथे एकूण १२ गुन्ह्यांचा खुलासा करण्यात पोलीस पथकाला यश आले. काशिमीरा, माणिकपूर, तुळींज, मुब्रा आणि मालाड पोलीस ठाणी.

# पालिकेच्या कारवाईत ७ लाखाचे प्लास्टिक जप्त!



विरार : राज्य सरकारच्या प्लास्टिक विरोधी मोहिमेला वसई-विरार महापालिकेच्या कारवाईतून चांगला प्रतिसाद मिळत असून प्लास्टिक मार्केटमधून हद्दपार करण्यासाठी पालिका कर्मचारी प्रयत्न करीत असताना सोमवारी साडेचार हजार किलो प्लास्टिकचा साठा त्यांनी जप्त केला. महापालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे ही कारवाई करण्यात आली. सोमवारी सकाळी प्रभाग समिती डी मधील वसई पूर्व नवघर येथील मूनबिन सोसायटी, गाळा क्र.८ येथे प्लास्टिकवर कारवाई करण्यात आली. तीन वाहनांमध्ये एकूण ४ हजार ६७७ किलो एकल वापराचे प्लास्टिक जप्त करण्यात आले. त्याचे बाजारमूल्य सात लाख रुपयांवर आहे. एकाच वेळी एकाच ठिकाणी केलेली महापालिकेची ही सर्वात मोठी कारवाई आहे.

## लूट थांबविण्यासाठी भरारी पथकांची स्थापना करण्याची मागणी



**लातूर/प्रतिनिधी**

दीपावलीच्या कालावधीत होणारी गर्दी लक्षात घेता खाजगी वाहतूकदारांकडून प्रवाशांची लूट केली जाते. वाहनात प्रवासी कोंबून धोकादायक वाहतूक केली जाते. हे थांबविण्यासाठी भरारी पथकांची स्थापना करून तपासणी केली जावी,अशा मागणीचे निवेदन अखिल भारतीय ग्राहक पंचायतीकडून प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांना देण्यात आले आहे. दीपावली मध्ये नोकरदार मंडळी आपापल्या गावाकडे परततात. कुटुंबियांसोबत सण साजरा करण्यासाठी सर्वजण गावाकडे येतात. यामुळे साहजिकच वाहनांना गर्दी होते. या संधीचा लाभ उठवत खाजगी ट्रॅव्हल्स व वाहतूकदारांकडून मोठ्या प्रमाणात भाडेवाढ केली जाते.याशिवाय अनेक वाहनांमध्ये क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी बसून बेकायदा वाहतूक सुरू असते.यात प्रवाशांची आर्थिक लूट होण्यासोबतच जीवितास धोका निर्माण होतो. त्यामुळे प्रादेशिक परिवहन विभागाने भरारी पथकांची स्थापना करून प्रवाशांचे होणारे आर्थिक नुकसान थांबवावे तसेच धोकादायक परिस्थितीतील वाहतूक बंद करावी, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे. या निवेदनावर अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे जिल्हाध्यक्ष दत्तात्रय मिरकले पाटील, मंजुश्री ढेपे, कौशल्या मंदाडे, रजिया सय्यद आदींसह पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. प्रवाशांची गरज लक्षात घेवून भाडे वाढ करून जास्त दराने तिकीट घेऊन प्रवाशी ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या ट्रॅव्हल्स व खाजगी वाहतूक करणाऱ्याची प्रवाशांनी तक्रार करावी, असे आवाहन जिल्हा ग्राहक संरक्षण समिती सदय दत्तात्रय मिरकले पाटील यांनी केले आहे.

## वाचन प्रेरणा दिन साजरा

वाडा: भारताचे माजी राष्ट्रपती व शास्त्रज्ञ ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषद शाळा वाडा येथे वाचन प्रेरणा दिन व हात धुवा दिन साजरा करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापिका सुप्रिया पाटील यांनी अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. सहशिक्षका विजया बाराथे यांनी कलाम यांच्या कार्याविषयी मुलांना माहिती सांगितली. मुलांना वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून वाचनाचे महत्व पटवून देऊन मुलांकडून गोष्टीची पुस्तके वाचन करून घेतली. मुलांना स्वच्छतेच्या सवयी अंगी लागाव्यात यासाठी साबण लावून हात कसे स्वच्छ धुवायचे याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. या उपक्रमात शाळेतील मुख्याध्यापिका सुप्रिया पाटील व सर्व सहशिक्षक विजया बाराथे, सीमा ठाकरे, हर्षला पाटील, रूतिका भोईर, अस्मिता ठाकरे, प्रचिती भोईर, विद्या गेडाम, प्रियांका महाजन, गणेश महाजन, उमेश चौगले व विद्यार्थी सहभागी झाले होते. तर वाड्यातील महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयात वाचकांसाठी विविध पुस्तके उपलब्ध करून दिली होती.

## तालुकास्तरीय स्पर्धा परीक्षेला विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद

**वाडा/प्रतिनिधी**




ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांच्या दृष्टीने मानसिक व बौद्धिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने वाड्यातील संगणक प्रशिक्षण संस्था आय. टी. जिनियस कॉम्प्युटर एज्युकेशन यांच्या वतीने स्पर्धापरीक्षेचे आयोजन करण्यात आले असल्याचे संस्थाचालक कल्पेश ठाणगे यांनी सांगीतले. विद्यार्थी, पालक, शाळांमधून स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून तालुक्यातील जवळपास पंधरा शाळांनी सहभाग नोंदवला होता. दोन्ही गटातून ३७१ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. या परीक्षेचा निकाल लगेचच जाहीर करण्यात आला, त्यामध्ये लहान गटात (७वी ते ११ वी) प्रथम क्रमांक भाविक भोईर (बा.ल.शिंगडा विद्यालय पोशेरी), द्वितीय मयुरी वाघ (बा.ल.शिंगडा विद्यालय पोशेरी), तृतीय श्रेयस यादव (पी.जे. हायस्कूल वाडा), तर मोठा गट (१२वी ते २२ वर्ष आतील) प्रथम क्रमांक ऋग्वेद सावंत (पी.जे.हायस्कूल वाडा), द्वितीय वैष्णवी पांडागळे (सिनियर कॉलेज वाडा), तृतीय अनिकेत पटारे (सिनियर कॉलेज वाडा), यांनी मिळविला. विजेत्या विद्यार्थ्यांना रोख रक्कमेसह सन्मानचिन्ह, मेडल व प्रशस्तीपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. याप्रसंगी जि.प. सदस्या भक्ती वलटे, रोहिणी शेलार, पोलीस निरीक्षक प्रदीप गीते, अमोल फडवले, युवराज ठाकरे, योगेश गवा, मृणाली नडगे, सुचिता पाटील, सचिन शिंगडा, शुभांगी गोवारी, नरेश काळे, डॉ.माधुरी कांबळे, भरत हजारे, डॉ. राहुल भोईर, शाळेचे मुख्याध्यापक बी.के. पाटील, संतोष साठे, साक्षी साठे, कांबळे सर, तालुक्यातील शाळांचे मुख्याध्यापक, तालुक्यातील ग्रामपंचायतींचे सरपंच यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. सदर कार्यक्रमासाठी आयोजन समिती व परीक्षक म्हणून तालुक्यातील शाळांच्या शिक्षकांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निखिल वाकले आणि अंजली कोकणे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजन समिती व आय. टी. जिनियस च्या स्टाफ ने मेहनत घेतली.

पान १ वरून....

### अश्लील व्हिडिओचा वाद प्राणावर...

भांडणे सोडविताना त्याची आई सिमरन हिला नाकी नऊ येत होते. घरात ही तो आई-वडिलांचे कधी ऐकत नव्हता. त्याच्याशी वाद घालून त्याच्याशीच भांडत होता. त्याच्या आईने त्याला कितीतरी वेळा समजावून सांगून नीट वागण्याचा सल्ला दिला होता. परंतु त्याच्या डोक्यात ते काही शिरत नव्हते. तो आपले तेच खरे म्हणत होता. शाळेला न जाता दिवसभर कुठे तरी मित्राच्याबरोबर राहुन टवाळगिरी करण्यात त्याला मजा येत होते. त्याचे शाळेकडे लक्ष नसल्याचे बघून त्याच्या आई वडिलांनी त्याला बऱ्याचवेळेला मारले ही होते. या लहान वयातच तो हाताबाहेर चालला होता. त्याला आवर घालणे कठीण होऊन बसले होते. तरी ही त्याचे आई वडिल त्याच्या चांगल्या भविष्यासाठी धडपडत होते. आपल्या जगण्याला चिमटा लावून ते त्याला चांगला माणुस करण्यासाठी प्रयत्नशील होते. गुरूवार दि.१९ ऑक्टोंबर रोजी साकीबचे त्याच्या आई वडिलाबरोबर भांडणे झाली. तो त्याच्याशी वाद घालीत हुज्जत घालत होता. हे बघून त्याचे वडिल समीर पठाण यांनी त्याला चांगलाच चोप दिला होता. त्यामुळे तो रडत रडतच घरात थांबला.तशातच तो कुठे तरी बाहेर जाणार असल्याची कुणकुण त्याच्या आई वडिलांना लागली. त्यांनी त्याला दम देत अभ्यास करण्यासाठी घरात थांबविले त्यानंतर संध्याकाळी ७.३०च्या दरम्यान समीर पठाण हे नेहमीप्रमाणे रात्र पाळीसाठी गोकुळ शिरगाव येथे कामावर निघून गेले. आई सिमरन या देखील साकीब याला घरात थांबवून आपल्या दुसऱ्या लहान मुलाला घेऊन गावात बाजार करण्यासाठी गेल्या. आई वडिल बाहेर गेल्याचे बघून साकीब हा कोणाला काही न सांगता घरातून निघून गेला. रात्री उशिरा पर्यत तो घराकडे परत आला नाही. त्यामुळे त्याची आई त्याची काळजी करू लागली होती. मुलगा घरातून भांडून गेला आहे. तो कुठे तरी काही तरी करून घेईल याची भिती तिला होती. त्यामुळे ती त्याचा सर्वत्र शोध घेऊ लागली. परंतु त्याचा काही शोध लागत नव्हता. जुने संभाजीनगर येथीलच जुबेर सलीम एकसंबे नावाचा त्याचा मित्र होता. त्याचेकडे साकीब हा त्यावेळी गेला. जुबेर हा त्याला बाळुमामानगर येथे भेटला. जुबेर याच्याबरोबर त्यावेळी त्याचा आणखीन एक अल्पवयीन मित्र होता. ते तिघे ही बालुमामानगर येथील चोपडे याच्या घराचे बांधकाम चालू आहे त्या ठिकाणी आले. हल्लीच्या मुलांना मोबाईलमध्ये वेगळे काही तरी बघायचे असल्याने ते तिघे ही बांधकाम चालू असलेल्या ठिकाणी आतील खोलीत गेले. तेथे जुबेर याने आपला मोबाईल साकीब याच्याकडे दिला.साकीब हा त्याचा मोबाईल चालू करून त्यातील अश्लिल फिल्म बघु लागला. काही वेळाने साकीब हा त्याचा मोबाईल हाताळीत असताना जुबेर याने आपल्या मोबाईलमध्ये एका मुलीचा फोटो ठेवलेला होता. तो फोटो गॅलरीत जावून साकीब हा बघू लागला. याचा राग जुबेर याला आला. त्याने त्याला तु माझ्या नटीचा फोटो का बघितलास? म्हणून त्याचेबरोबर वाद घालून भांडण काढू लागला. मुळात साकीब हा भांडखोर आणि चिडखोर असल्याने त्याने त्याचा मोबाईल जमीनीवर रागाने फेकून दिला. त्यामुळे जुबेर हा जास्तच त्याच्यावर चिडला. दोघात हाणामारी सुरू झाली. दोघे ही एकमेकांना शिव्या देत एकमेकांच्या अगांवर जावू लागले. त्यात जुबेरच्या अल्पवयीन मित्राने जुबेर याला साथ दिली. दोघांनी साकीब याला खाली पाडून मारहाण करायला सुरूवात केली. त्यातच रागाच्या भरात असणाऱ्या जुबेर याने बांधकाम चालू असलेल्या ठिकाणी पडलेला मोठा पेव्हिंग ब्लॉक घेतला आणि साकीबच्या डोक्यात जोरात घातला. त्यासरशी त्याचे डोके फुटून त्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला. तो तडफडतच खाली टाचा घासत होता. जागीच त्याचा मृत्यू झाला. हे बघून जुबेर एकसंबे आणि त्याचा मित्र तेथून पळून गेले. दुसऱ्या दिवशी सकाळी ७.३०च्या दरम्यान चोपडे याच्या बांधकाम शेजारी राहणारी रंजना शेवाळे नावाची माहिला जळणासाठी कचरा गोळा करीत असताना ती चोपडे याच्या बांधकाम चालू असलेल्या ठिकाणी गेली. तेथील अतील खोलीत तिला एका मुलाचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडला असल्याचे दिसून आले. तिने जवळ जावून पाहिले असता तिला तो मुलगा ओळखीचा वाटला. मयत मुलाच्या जवळच रक्ताने माखलेला पेव्हिंग ब्लॉकचा दगड पडला होता. हे बघून तिने आपल्या मोबाईलवरून मयत मुलगा सकीब पठाण याची आई सिमरन पठाण याच्याशी संपर्क साधून या घटनेची माहिती दिली. आपल्या मुलग्याचा कुणी तरी खून केला आहे याची माहिती मिळताच सिमरन या मोठ मोठयाने आक्रोश करीत बाळुमामानगर येथील चोपडे याच्या बांधकाम चालू असलेल्या ठिकाणी आल्या. तोपर्यंत घटनास्थळी बघ्यांची बरीच गर्दी झाली होती. कुणी तरी या घटनेची माहिती जवळच असणाऱ्या बसवेश्वर पोलीस स्टेशनला दिली. पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनेची पाहणी करून माहिती घेतली.मयत मुलाची ओळख पटली असल्याने त्यांनी तपासाला सुरूवात करून या घटनेची माहिती घेतली. पोलीसांनी घटनेचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी निपाणी येथील महात्मा गांधी रुणालयात पाठवून देण्यात आला. घटनास्थळी जिल्हा पोलीस प्रमुख डॉ.भिमा शंकर गुळेद, चिक्कोडीचे पोलीस उपाधिक्षक गोपाळ कृष्ण गौडर, पी.आय.बी.एस तळवार, शहर पोलीस ठाण्याचे पो.उपेनिरी. उमादेवी, बसवेश्वर पोलीस ठाण्याचे पो.निरी.रमेश पवार यांनी भेट दिली. मयत साकीब हा त्या ठिकाणी आदल्या रात्री कशासाठी गेला होता. त्यावेळी त्याचेसोबत आणखीन कोण कोण होते याची माहिती पोलीस घेत होते. घटनास्थळावरील मोबाईल लोकेशनवरून त्या ठिकाणी घटनेच्या वेळी जुबेर एकसंबे नावाच्या तरूणाचा मोबाईल असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. त्या आधारे पोलीसांनी मयत साकीब याच्या जवळच्या चार पाच अल्पवयीन मित्रांना ताब्यात घेऊन त्याचेकडे चौकशी करायला सुरूवात केली. परंतु त्याचेकडून ठोस अशी काही माहिती पोलीसांना मिळाली नाही. मयत साकीब याने आदल्या रात्री जुबेर एकसंबे याला फोन केल्याची माहिती मिळताच पोलीसांनी त्याला ताब्यात घेतले. त्याचेकडे पोलीसांनी चौकशी केली असता तो पोलीसांना उडवा-उडवीचे उत्तरे देत होते. त्याला पोलीसी खाक्या दाखविताच त्याने आपला गुन्हा कबुल करीत तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसाना देवून या घटनेत आपल्याला एका अल्पवयीन मित्राची मदत झाल्याचे त्याने पोलीसांना सांगितले. या घटनेची फिर्याद मयत साकीब याचे वडिल समीर पठाण यांनी बसवेश्वर पोलीस ठाण्यात दिल्यावर पोलीसांनी साकीब समीर पठाण (वय १४) याच्या खून प्रकरणी जुबेर सलीम एकसंबे (वय २१) आणि त्याचा अल्पवयीन मित्र याच्या विरोधात आयपीसी कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्यांना बेळगावी येथील कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने जुबेर सलीम एकसंबे याची रवानगी बेळगावी येथील हिंडलगा जेलमध्ये केली तर दुसऱ्या अल्पवयीन मुलाची रवानगी बालसुधारगृहात केली. या घटनेचा पुढील तपास बसवेश्वर पोलीस ठाण्याचे पोलीस करीत आहेत. अल्पवयीन मुलाच्यातील भांडणे कधी विकोपाला जातील आणि त्यातून कधी कोणती अनुचीत घटना घडेल हे काही सांगता येत नाही. हेच या घटनेवरून दिसून येते.

### एकतर्फी प्रेम करणारा वासनेने पेटला...

हिच्याशी सारखा अधून मधून बोलत होता. पुजाच्या मनात काही ही नसल्याने ती त्याच्याशी मनमोकळेपणाने बोलत होती परंतु याचा नेमका वेगळा अर्थ सनी याने लावला होता. तिचे आपल्यावर प्रेम आहे असे त्याला वाटत होते. ती कामावर चालली किंवा कामावरून घराकडे परत चालली की सनी तिला आपल्या गाडीवरून सोडत होता. १९ वर्षीय पुजा ही दिसायला देखणी आणि सुंदर असल्याने ती त्याच्या मनात बसली होती. तिला आपल्या जाळयात ओढण्यासाठी सनी येणकेण प्रयत्न करीत होता.ती मात्र आपण भले आणि आपले काम भले अशी वागत होती. ती सनीला भेटण्याचा प्रयत्न ही करीत नव्हती.तो मात्र तिला भेटण्यासाठी कोणतेही कारण शोधत होता. तो समोर दिसला किंवा आला तर तेवढयापुरते बोलत होती. तो तिच्याशी जवळीकता साधण्याचा प्रयत्न करीत असताना एकदा दोनदा त्याने तिच्याकडून तिच्या पगाराचे हात उसणे पैसे घेतले. ते पैसे ही त्याने तिला वेळेत परत दिले नाहीत. तो कारण काढून तिला भेटायला आला की ती त्याच्याकडे आपण दिलेले उसणे पैसे परत मागत होती. तो मात्र तिला भेटण्यासाठी म्हणून तिच्या मागे मागे लागत होता. त्याचा त्रास हल्ली वाढला होता. मागे एकदा दोनदा त्याने तिला एकांतात नेऊन माझे तुझ्यावर प्रेम आहे,तु मला त्या कामासाठी पाहिजे आहेस असे बोलून दाखविले होते. खरे तर तिचे त्याच्यावर प्रेम वैगरे काहीही नव्हते. तो मात्र तिला गळ टाकून आपल्या जाळ्यात अडकवत असल्याचे तिने मनातून ओळखले होते. त्यावेळी तिने त्याला स्पष्टच सांगून टाकले की माझे आई वडिल जेथे माझे लग्न लावून देतील तेथे मी लग्न करणार आहे. माझी घरची परिस्थीती ही चांगली नाही. त्यामुळे आई वडिल ज्या मुलाशी सांगतील त्या मुलाशीच मी लग्न करणार आहे. तिने आपल्याला नकार दिला आहे हे त्याच्या लक्षात आल्यावर तो जास्तच तिच्यावर चिडला होता. तो तिचा नकार पचवू शकला नाही. तो जास्तच वैफल्यग्रस्त झाला होता. त्याच्या मनात आता तिच्याविषयी कामवासना निर्माण झाला. त्याला ती त्या कामासाठी पाहिजे असल्याने सकाळ रात्री ती कामावर चालली किंवा कामावरून घराकडे परत चालली की तो तिला वाटेत अडवून तिला त्रास देत होता. हल्ली तर त्याचा त्रास खुप वाढला होता. तो तिच्या दुकानात जावून तिला भेटायला बाहेर बोलवत होता. ती मात्र त्याला टाळत होती. त्याचा त्रास वाढल्याने तिने याची माहिती आपले वडिल खंडू अडगळे यांना दिली. खंडू अडगळे यांनी याची माहिती वीटभट्टी मालक अनिल कुंभार यांना दिली. त्या दोघांनी विचार करून एकदा दोनदा सनी कांबळे याला भेटुन मुलगीला त्रास देवू नकोस नाही तर तुझ्या विषयी आम्ही पोलीस स्टेशनला तक्रार देतो अशी धमकी दिली. तरी ही तो पुजाच्या मार्गावर येत होता. ती कामाला चालली की, तो तिला रस्त्यात अडवून विनाकारण त्याला त्रास देत होता. एकदा दोनदा तिने ही त्याला चांगले खडसावून परत माझ्या वाटेला येवू नकोस, माझे पैसे ही मला परत देवू नकोस अशी समज दिली. परंतु ऐकेल तो सनी कसला. त्याच्या मनात पुजा बसली असल्याने तो वेगळाच विचार करीत होता. एकदा तिला आपल्या अंगखाली घेऊन वापरयाची आणि मगच तिचा नाद सोडयाचा असा त्याने विचार केला. त्यासाठी तो सारखा तिला रस्त्यात अडवून त्रास देत होता. सनी हा गुन्हेगारी प्रवृतीचा असल्याने त्याला कोणाची भिती वाटत नव्हती. सोमवार दि.९ ऑक्टोंबर रोजी रात्री ८च्या दरम्यान पुजा आपले काम संपवून साखरवाडी येथील घराकडे जात असताना सनीने तिला ओढयाजवळील दत्त मंदिरा जवळ अडवले. माझे तुझ्याकडे दुसरे काम आहे मला तुझ्याशी मनातील बोलयाचे आहे असे तो तिला म्हणत होता. ती मात्र त्याला टाळत होती. तरी ही त्याने तिला जबरदस्तीने पृथ्वी शाळेच्या मागील बाजुस असणाऱ्या ओढयाच्या शेजारी असणाऱ्या झाडाझुडूपाकडे नेले. त्याच्या मनात काही तरी वेगळेच असल्याचे तिने ओळखले होते. ती त्याला हात आपल्या हातातून सोडविण्याचा प्रयत्न करीत होती. त्याने फुल्ल दारू पिली असल्याने तो काही ही तिचे ऐकण्याच्या मनस्थिीती नव्हता. ओढयाच्या मागे असणारा भाग तसा निर्मनुष्य असल्याने तिचा आरडाओरडा तरी ऐकणार कोण हा प्रश्नच होता. तरी ही त्याला मागे ढकलून पळून जाण्याचा प्रयत्न करीत असताना त्याने तिला खाली पाडले. मला एकदा करू दे. माझे समाधान कर असे तो तिला म्हणत होता. ती त्याला प्रतिकार करीत होती. त्याने तिचा कमीज आणि सलवार काढून टाकला. तो तिच्या अंगावर पडून तिला ओरबाडू पाहत होता. ती त्याला आपल्या अंगावरून ढकलून देत असताना तो तिच्यावर जबरदस्ती करू लागला. त्या दोघांची झटापट लागली होती. त्या गडबडीत तिचे चप्पल बाजुला पडले होते.तशा ही परिस्थीतीत तिने त्याला आपल्या अंगावरून बाजुला ढकलून दिले आणि ती उठून पळून जाण्याचा प्रयत्न करीत असताना परत त्याने तिला पकडले तिचे अंगावरील कपडे फाडून टाकले. तिचा मोबाईल ही बाजुला पडला आणि तो बंद पडला. त्याने तिचा गळा जोरात आपल्या दोन्ही हाताने आवळून धरला. तशी तिची हालचाल मंदावली. तिचा श्वास रोखला होता. त्याने दोन्ही हाताने जोराने गळा दाबून धरल्याने ती खाली पडली. काही वेळातच तिचा श्वासो श्वास बंद पडला आणि तिचा जागीच मृत्यू झाला. तेथून कोणाला काही कळणार नाही अशा पध्दतीने तो तेथून गेला. परंतु जाताना त्याने तिच्या बंद पडलेल्या मोबाईलमधील सीम काढून ते मोडून टाकले. त्या रात्री ती कामावरून उशिरापर्यत घराकडे परत न आल्याने तिच्या आई वडिलांनी तिच्या दुकान मालकाकडे चौकशी केली असता त्याने त्यांना ती उशिरा घरी गेली असल्याचे सांगितले. रात्री ती परत न आल्याने तिच्या आई वडिलांनी तिचा शोध ग्यायला सुरूवात केली परंतु तिचा काही शोध लागला नाही. दुसऱ्या दिवशी खंडू अडगळे यांनी पुजा रात्री घराकडे परत आली नसल्याची माहिती वीट भट्टी मालक अनिल कुंभार यांना दिली. त्या दिवशी संध्याकाळी उशिरा खंडु अडगळ यांनी पेठ वडगाव पोलीस स्टेशन गाठून मुलगी पुजा अडगळे (वय १९) ही काल रात्री पासून बेपत्ता झाली असल्याची तक्रार दिली. पोलीस ही तिचा कसून शोध घेत होते. परंतु तिचा काही पत्ता लागत नव्हता. या घटनेला चार दिवस झाले. तिचा मोबाईल ही लागत नव्हता. अडगळे पती पत्नी काळजीत होते. सोमवार दि.१६ ऑक्टोंबर रोजी एक शेतकरी पृथ्वी हायस्कुलच्या मागे असणाऱ्या ओढयाच्या मागे जनावरांसाठी वैरण आणण्यासाठी गेला. त्यावेळी तो वैरण कापत असताना कसला तरी दुर्गंधी युक्त वास येत होता. त्याने झाडाझुडपात पुढे जावून पाहिले तर एका २० वर्षीय मुलीचा अर्धनग्न अवस्थेत मृतदेह पडला होता. तो मृतदेह पुर्णपणे कुजला होता. तर तिच्या शरीराचे लचके कुत्र्यांनी तोडले होते. त्याने ही माहिती त्वरीत पेठवडगाव पोलीसांना दिली. पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. मयत मुलीवर अत्याचार करून तिचा गळा आवळण्यात आला होता. मयत मुलगी ही बेपत्ता झालेली पुजा अडगळे ही असावी ही शंका आल्यावर पोलीसांनी खंडू अडगळे यांना घटनास्थळी बोलावून घेतले. त्यांनी मुलीच्या फाटलेल्या कपड्यावरूनद व बाजुला पडलेल्या चप्पलावरून आपली मुलगी पुजा अडगळे असल्याचे त्यांनी पोलीसांना सांगितले. घटनास्थळी बरीच गर्दी झाली होती. घटनास्थळावर मयत पुजाला बघून अडगळे पती पत्नीनी मोठा अक्रोश केला. घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह कोल्हापूर येथील सीपीआर रुग्णालयात पाठवून दिला. घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.रोहिणी सोळंके, इचलकरंजी उप विभगीय अधिकारी आणि पो.निरी भैरव तळेकर यांनी भेट देवून तपासाच्या योग्यात त्या सुचना पोलीसाना दिल्या या घटनेची माहिती पोलीसांनी मयत पुजा हिच्या वडिलाकडे घेऊन त्याचा कोणावर संशय आहे का? असे विचारले त्यावर खंडू अडगळे यांनी पुजा हिला सनी कांबळे नावाचा तरूण त्रास देत असल्याची माहिती दिली. सनी कांबळे हा पोलीस रेकॅार्डवरील गुन्हेगार असल्याने पोलीसांनी त्याचा शोध घ्यायला सुरूवात केल्यावर अवघ्या काही तासात त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे मयत पुजा हिच्या विषयी चौकशी केली असता त्याने दारूच्या नशेत आपण तिच्यावर जबरदस्ती करीत तिचा गळा दाबून खून केल्याची माहिती त्याने पोलीसांना दिली.त्याने आपला गुन्हा कबुल केल्यावर पोलीसांनी या घटनेची तक्रर मयत पुजा हिचे वडिल खंडू अडगळे याच्याकडून घेतली. त्यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीसांनी पुजा खंडु अडगळे (वय १९) रा.वाटार साखरवाडी हिच्यावर बलात्कार करून खून केल्याप्रकरणी सनी अरूण कांबळे (वय २२) रा.वाठार याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२,२०१ ३७६ त्याचेवर गुन्हा दाखल केला. त्याला कोल्हापूर येथील कोर्टात उभे केले असता मा.कोर्टाने पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.या घटनेचा तपास पेठवडगाव पोलीस स्टेशनचे पो.निरी भैरव तळेकर याच्या मार्गदर्शनाखाली पो.उप.निरी गिरीश शिंदे, हवा.रवी गायकवाड,महेश गायकवाड, मिलिंद टेळी, अजित पाटील, जितेंद्र पाटील यांनी केला. हल्ली मुली कोठच सरक्षित नाहीत त्या वासनांध नराधमाच्या आत्याचाराला बळी पडत आहेत. कायदयाचा धाकच अपुरा पडत असल्याने अशा घटना घडत आहेत हेच या घटनेवरून दिसून येते.

### पैशांवरून झालेला वाद विकोपाला गेला...

अवस्थेत मृतदेह आरसीएफ पोलीसांना मिळून आल्याने पोलिसांनी रक्ताच्या थारोळ्यातील व्यक्तोला उपचारासाठी राजावाडी हॉस्पिटलमध्ये उपचार करण्यासाठी नेले. त्या व्यक्तीवर उपचार सुरु असताना डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. पोलिसांनी पंचनामा करून आरसीएफ पोलीस ठाण्यात कलम ३०२ भादविसह कलम ३७ (१) (अ),१३५ मपोका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. आणि तो मृतदेह पोस्ट मॉर्डनसाठी रवाना करण्यात आला. सदरचा गुन्हाचा तपास करण्यासाठी पूर्व प्रादेशिक विभागाचे अपर पोलीस आयुक्त विनायक देशमुख, परिमंडळ ६ चे पोलीस उपायुक्त हेमराजसिंह राजपूत, ट्रॉम्बे विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त सुहास हेमाडे, आरसीएफ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुरलीधर करपे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. (गुन्हे) रणजित जाधव व पथक करू लागले. या गुन्हयाच्या तपासाकरीता पोलीसांची चार पथके करण्यात आली. तपास पथकाने केलेल्या तपासामध्ये कॅटरिंगचे काम करणा-या मित्रांमध्ये झालेल्या भांडणातून सदरची घटना घडल्याचे दिसून आले. तपास पथकाने दिवसरात्र तपास करून गुन्ह्यातील संशयित आरोपी राजेश ताते (३६), रा. शंकर देऊळ आणिक गाव चेंबूर याला अटक केली. त्याच्या कडे या गुन्ह्याबाबत चौकशी केली असता, त्याने ही हत्या पैशाच्या वादातून आपल्या एका मित्राच्या मदतीने केल्याची कबुली दिली. इलियास जब्बार खान (४०) हा मूळचा उत्तरप्रदेश येथील बहाराईच गावाचा रहिवासी असून तो १०-१२ वर्षापासून कॅट्रीग मध्ये कूकचे काम करीत होता. कामाच्या व्यापात तो ४ वर्षे झाली गावी गेला नाही. गावी पत्नी, मुली आणि आई-वडिल हे सर्व जण एकत्र राहतात. आरोपी राजेश तोटे हा खुशी कॅटरिंग येथे ४-५ वर्ष काम करीत होता. ६ महिन्यापूवी त्याने काम सोडले होते. मात्र त्याचे जाणेयेणे होते. खुशी कॅटरिंगचे मरवली चर्च येथे गोडाउन आहे,तर दुसरे शंकर देऊळ आणिक गाव येथे गोडाइन आहे. एलियास खान याने त्यादिवशी मरवली चर्चच्या गोडाऊन मधील सामान शंकर देऊळ गोडाऊन मध्ये टाकले. तेव्हा एक हजार रुपये मेहताना एलियास यास दिला. त्यानंतर एलियास, राजेश ताते व अरमान हे तिघे रेडसन बार मध्ये दि. ९ आक्टोबर रोजी रात्री ९.३० ते बार बंद हाईपर्यंत दारू पित बसले. नंतर या तिघात पैशाच्या विषयावरून त्यांच्यात वाद झाला. त्या वादात अरमान व राजेश ताते या दोघांनी एलियास खान यास मारहाण केली. तर अरमान याने एलियास खानच्या मानेवर सुरी फिरविली. तसाच एलियास खान रक्तच्या थारोळ्यात खाली कोसळला. त्याला रक्ताच्या थारोळ्यात पडलेला पाहून या दोन्ही आरोपींनी घटनास्थळवरून पळ काढला. अशा प्रकारे राजेश ताते याने गुन्ह्याची कबुली दिली आहे. अद्यापपर्यंत तपामादस्यान राजेश ताते यास अटक करण्यात आली. अरमान (वय २५) हा फरार असून पोलीस पथके त्याचा शोध घेत आहेत. आरसीएफ पोलीसांनी अरमान,याचा शोध घेण्याकरीता छायाचित्रासह शोध पत्रिका प्रसारित केली असून त्याचा कसून शोध घेण्यात येत आहे. दरम्यान अरमान बाबत काही माहिती मिळाल्यास त्वरित आरसीएफ पोलीस ठाणेशी संपर्क साधावा असे आवाहन नागरिकांना केले आहे.

पान ८ वरून....

### पालघर जिह्यात सरपंचपदांसाठी १९४...

सायदेमध्ये एक सदस्य बिनविरोध झाले आहेत. आता २८ जागांसाठी ७६ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. दरम्यान पालघर तालुक्यात १६ ग्रामपंचायतीपैकी शिलटे गावामध्ये नागरिकांनी मतदानावर बहिष्कार टाकला आहे, तर टेंभी खोडावे व खानिवडे या दोन ग्रामपंचायती बिनविरोध झाल्या आहेत. त्यामुळे आता ४७ ग्रामपंचायतींच्या १३१ जागांसाठी ३४५ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

### जव्हार येथे धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात...

गायन केली. मा. अध्यक्ष याचे मनोगत होऊन, सर्व मान्यवरांचे आयु. सागर बल्लाळ यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रमाचे निमंत्रक आयु. गोविंदराव बल्लाळ, आयु. सागर बल्लाळ, आयु. अमोल बर्वे धांडे सर आयु. प्रभाकर जाधव, आयु. रमेश केदार, सर्व बौद्धजन उपासक, उपासिका यांनी योगदान दिले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उत्तम शेवाळे यांनी केले.


30 OCT TO 05 NOV 2023 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 10/28/2023 10:27 PM Page 1



# घरफोडी करणाऱ्या सराईत तीन चोरट्यांना अटक

## एका पिस्टलसह १८ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त





**लातूर/करकरे अंबादस**

अहमदपूर शहरातील एका सराफ व्यापाराच्या घरात प्रवेश करून धाडसी घरफोडी करणाऱ्या तीन सराईत चोरट्यांना अटक करण्यात अहमदपूर पोलिसांना यश आले आहे. या घरफोडी प्रकरणात अटक केलेल्या आरोपीकडून एक पिस्टलसह १८ लाख ६ हजार रुपयांचा चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याबाबत पोलीस सूत्राकडून मिळालेली माहिती अशी की १७ जून ते १९ जून २०२१ मध्ये मध्यरात्रीचे वेळी पोलीस ठाणे अहमदपूर येथील सराफा व्यापारीच्या घरात अज्ञात चोरट्यांने प्रवेश करून घरात ठेवलेले सोन्याचे दागिने व एक पिस्टल चोरून नेल्याची घटना घडली होती. त्यावरून पोलीस स्टेशन अहमदपूर येथे गुरनं २७९/२०२१ कलम ४५४, ४५७, ३८० भादवी. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आले होता. सदर गुन्ह्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून आटोकाठ प्रयत्न करण्यात आले होते. त्यासाठी रेकॉर्डवरील तसेच शेजारील जिल्ह्यातील विविध गुन्हेगारांना ताब्यात घेऊन विचारपूस करून तपास करण्यात आला. गोपनीय बातमीदार नेमून त्यांच्याकडून माहिती मिळवण्यात येत होती. परंतु सदर गुन्ह्यातील आरोपीचा शोध लागत नव्हता.

गुन्हा घडून खुप कालावधी होऊनही सदरचा गुन्हा उघडकीस न आल्याने सदरचा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी निर्देशित करून महत्त्वाच्या सूचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी, अहमदपूर मनीष कल्याणकर यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे अहमदपूरचे पोलीस निरीक्षक सुधाकर देडे यांचे नेतृत्वात पोलीस पथक नेमुन तपासाबाबत सूचना देण्यात आले होते. तपासा दरम्यान पोलीस पथक गुन्ह्याची पद्धत, रेकॉर्डवरील गुन्हेगारांचे विश्लेषण करून तसेच गोपनीय बातमीदार नेमून माहिती मिळवण्याचा कसोशीने प्रयत्न करीत होते दरम्यान तपास पथकाला मिळालेल्या माहितीच्या आधारावरून आरोपी नामे राम तुकाराम बने, वय २७ वर्ष, राहणार गायकवाड कॉलनी, अहमदपूर. विजय अशोक कदम, राहणार गायकवाड कॉलनी, अहमदपूर व केदारनाथ नामदेव गाडे, वय २९ वर्ष, राहणार रुई तालुका अहमदपूर यांना दिनांक २४ आक्टोबर २०२३ रोजी ताब्यात घेऊन त्यांचेकडे गुन्ह्याबाबत विचारपूस केले असता, त्यांनी गुन्ह्याची कबुली देऊन गुन्ह्यात चोरलेले १७ लाख ६६ हजार रुपयाचे सोने व एक पिस्टल असा एकूण १८,०६,४०० रुपयांचा मुद्देमाल काढून दिल्याने ते जप्त करण्यात आले आहे.

गुन्ह्याचा पुढील तपास वरिष्ठांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक सुधाकर देडे करीत आहेत. तपास पथकाने वरिष्ठांचे मार्गदर्शनात अतिशय कुशलतेने, गुन्ह्याच्या पद्धतीचा बारकाईने विश्लेषण व अभ्यास करून, रेकॉर्डवरील गुन्हेगारांची गोपनीय माहिती मिळवून गुन्ह्यात चोरीस गेलेले सोने व पिस्टल परत मिळविले आहे. सदर गुन्हा उघडकीस आणण्यासाठी वरिष्ठांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी,अहमदपूर मनीष कल्याणकर यांचे मार्गदर्शनात, पोलीस निरीक्षक सुधाकर देडे नेतृत्वातील टीम मधील अहमदपूर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक सूर्यवंशी, पोलीस अंमलदार तानाजीआरदवाड, राजकुमार डबेटवार, बापू धुळगुंडे, रुपेश कज्जेवाड, पाराजी पुठेवाड यांनी चोरीच्या गुन्ह्याचा कौशल्यपूर्ण तपास करून गुन्ह्याची उकल करून गुन्हा उघडकीस आणून, गुन्ह्यात चोरलेला मुद्देमाल हस्तगत करण्याची कामगिरी बजावली आहे.

# कल्याणमध्ये पार्किंगच्या वादातून कारची तोडफोड करून चालकाला रिक्षाचालक व त्याच्या आईने केली बेदम मारहाण



**कल्याण/प्रतिनिधी**

कल्याण पूर्वेत शास्त्रीनगर परिसरात गाडी लावण्याच्या वादावरून आरोपी रिशी यादव याने चार चाकी गाडी फोडत एका तरुणास बेदम मारहाण केली आहे. ही संपूर्ण घटना सीसीटीव्हीत कैद झाली असून आरोपीविरोधात कोळशेवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. कल्याण पूर्वेतील मलंग रोडवरील शास्त्रीनगर परिसरात राहणाऱ्या कन्हैया झा आपले काम संपून घरी परतत असताना शास्त्रीनगर परिसरात आरोपी रिशी यादव हा रिक्षाचालकाला शिवीगाळ करत होता. त्याचवेळेस कन्हैया आपली चार चाकी गाडी पार्क करत असताना आरोपी रिशी यादव आरडाआरोड करत त्याच्याकडे चाकू घेऊन आला आणि त्याचवेळेस त्याची आई लोखंडी रॉड घेऊन त्याठिकाणी आली. आरोपी रिशी याने तो रॉड घेऊन कोणतेही कारण नसताना चारचाकी गाडी फोडली तसेच फिर्यादीच्या डोक्यात देखील रॉड मारून त्यांना देखील जखमी केले. शिवीगाळ करत 'तुम सब इधर गाडी पार्क करते हो, किसी को मैं छोडुंगा नहीं' अशी धमकीही दिली. दरम्यान ही संपूर्ण घटना सीसीटीव्हीत कैद झाली असून कोळसेवाडी पोलीस ठाण्यात आरोपी रिशी यादव आणि त्याच्या आईविरोधात तक्रार दाखल करण्यात आली असून पोलिसांनी याप्रकरणाचा तपास सुरू केला आहे. तसेच फिर्यादी कन्हैया झा यांना उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत फिर्यादी झा यांनी सांगितले की, मंगळवारी मी साकेत कॉलेज, कल्याण पूर्व येथील माझे काम आटपून माझी अर्टिका कार पार्क करत होतो. तेव्हा रिषी यादव हा रिक्षावाला राजकुमार गिरीला शिवीगाळ करत होता. तो माझ्या गाडीच्या इथे आला आणि पाठीमागून त्याची आई देखील हातात लोखंडी रॉड घेवून आली. तिने तिचेकडील रॉड हा रिषी यादव याच्या हातात दिला. त्यावेळी रिषी यादव याने आईच्या हातातून लोखंडी रॉड घेतला आणि कारवर जोरजोरात मारण्यास सुरूवात केली. त्यामुळे मी घाबरलो आणि कारच्या बाहेर आलो असता क्षणात माझे डोक्याच्या उजव्या बाजूला कपाळावर जोरात रॉडने फटका मारून दुखापत केली. त्यानंतर शिवीगाळ करून 'तुम सब साले इधर गाडी पार्क करते हो, किसी को मैं छोडुंगा नही असे म्हणाला.

# वाडा येथे वीजपुरवठा खंडित करण्यास गेलेल्या उपकार्यकारी अभियंत्यावर कोयत्याने हल्ल्याचा प्रयत्न; आरोपीला अटक!



**वाडा/प्रतिनिधी**

थकबाकीदाराचा वीजपुरवठा खंडित करण्यास गेलेल्या महावितरणच्या उपकार्यकारी अभियंत्यावर कोयत्याने हल्ला करण्याचा प्रयत्न वाडा तालुक्यातील वारेट येथे शुक्रवारी (२७ ऑक्टोबर) दुपारी घडला. वाडा उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता अविनाश कटकवार यांच्यावर हा हल्ल्याचा प्रयत्न झाला असून त्यांच्या फिर्यादीवरून गणेशपुरी पोलीसांनी गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली आहे. किशोर यशवंत पाटील (राहणार वारेट, ता. भिवंडी) असे या प्रकरणी अटक झालेल्या आरोपीचे नाव आहे. अंबाडी शाखेंतर्गत वीजबिल वसुलीसाठी उपकार्यकारी अभियंता कटकवार, शाखा अभियंता मनोज देशमुख, वरिष्ठ तंत्रज्ञ सुधीर जाधव, संतोष शेलार, सुरक्षा रक्षक प्रदिप अधिकारी हे शुक्रवारी दुपारी वारेट गावात गेले. आरोपी किशोर पाटील याच्याकडे दोन वीज जोडण्यांची ७५ हजार रुपयांची थकबाकी आहे. या थकबाकीपोटी वीज पुरवठा खंडित करण्याची कारवाई सुरू असताना आरोपीने कटकवार यांच्यावर कोयत्याने हल्ला करण्याचा प्रयत्न केला. परंतू समवेतच्या सहकाऱ्यांनी व आरोपीच्या कुटुंबियांने कटकवार यांचा बचाव केला. या भ्याड हल्ल्यानंतरही न डगमगता कटकवार व त्यांच्या चमूने आरोपीच्या दोन्ही वीज जोडण्यांचा वीजपुरवठा खंडित करून गणेशपुरी पोलीस ठाणे गाठले. कटकवार यांच्या फिर्यादीवरून गणेशपुरी पोलिसांनी सरकारी कामात अडथळा (कलम ३५३), शिवीगाळ व दमदाटी केल्याचा (कलम ५०४ व ५०६) गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली आहे.

# होनाळीच्या सरपंचपदी दीपक अशोकराव चांद्रोरे तर उपसरपंच औदुंबर पांचाळ होनाळीकर



देवणी : देवणी तालुक्यातील होनाळी येथे फेर निवड करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सहाय्यक गट विकास अधिकारी व्ही.एस. कांबळे, विस्तार अधिकारी कट्टेवार, ग्रामसेवक कैलवाडे, तलाठी संघटनेचे तालुकाध्यक्ष गोपाळ बिरादार, मंडळ अधिकारी ढगे मॅडम, पोलीस बीट आमलदार शौकत, सरपंच पदाची निवड झाल्यानंतर अभिनंदन करताना देवणीचे गट विकास अधिकारी श्री सोपान अकेले साहेब, देवणीचे पोलीस निरीक्षक श्री विष्णुकांत गुट्टे, तसेच सर्व राजकीय सामाजिक मंडळींनी भरभरून शुभेच्छा दिल्या यावेळी गावातील ग्राम पंचायत सदस्य सतीश बिरादार सौ. रेणुकाबाई बिरादार, श्रीमती बालिका बोरुळे, सौ. सुनंदाबाई अलूरे, सौ वैशाली इंद्राळे सौ भारतबाई गोडबोले, रामदास सूर्यवंशी तसेच गावातील पुढारी नेते, साजिद पटेल यांनीही निवड झाल्याबद्दल अभिनंदन केले आहे.

# बनावट गुटखा तयार करणाऱ्या कारखान्यावर धाड पोलीस अधीक्षकांच्या विशेष पथकाची कामगिरी!



**लातूर/प्रतिनिधी**

लातूर पोलिस अधीक्षक सोमय मुंडे यांचे आदेशान्वये परिविक्षाधीन पोलीस उपाधीक्षक अंकिता कणसे यांच्या पथकाने औराद शहाजनी येथे बनावट गुटखा तयार करणाऱ्या कारखान्यावर छापा टाकला. येथून पोलिसांनी ०१ लाख ९४ हजारांचा बनावट गुटखा व कच्चा माल, साहित्य जप्त केले आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की पोलिस अधीक्षकांना सोमय मुंडे यांना एक गोपनीय माहिती मिळाली की, औराद शहाजनी येथे अवैधरित्या, मानवी शरीरास अपायकारक बनावट गुटखा तयार करून त्याची पॅकिंग करून विक्री करत आहे. मिळालेल्या गोपनीय माहितीची शहनिशा व खात्री करून परिविक्षाधीन पोलीस उपाधीक्षक अंकिता कणसे यांनी पथकासह महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवर पोलीस ठाणे औरद शहाजणी हद्दीत दुर्गम भागात झाडीमध्ये तयार केलेल्या एका पत्राचे शेडमध्ये चालू असलेल्या बनावट गुटखा कारखान्यावर पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास अडीच किलोमीटर पायी चालत जाऊन धाड टाकली त्यामध्ये गुटखा पॅकिंग करण्याची मशीन, वेगवेगळ्या प्रकारचे कच्चे मटेरियल तसेच बनावट तयार केलेला विमल पान मसालाच्या गोन्या इत्यादी साहित्य असे १,९४,५६६/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून दोन आरोपी नामे १) श्रीनिवास गणपतराव शिवणे, वय २७, वर्षे राहणार औराद शहाजनी, तालुका निलंगा. २) अभिषेक कालिदास बिराजदार, वय २४ वर्षे, राहणार औराद शहाजनी, तालुका निलंगा. यांचे विरुद्ध पोलीस स्टेशन औराद शहाजनी येथे गुरन. २४०/२०२३ कलम १८८, २७२, २७३, ३२८, ३४ भादवी व अन्नसुरक्षा व मानके कायदा २००६चे कलम ५९ अन्वये गून्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी छापा टाकला त्या ठिकाणी बनावट गुटखा, सुगंधित तंबाखू, गुटखा बनवण्याची मशीन सुपारी, मॅग्निशियम पावडर, कत्था पावडर, विमल पानमसाला व खाली रॅपर्स, गुटखा लेबलिंग पॅकिंग उपयोगी इतर साहित्य असे १ लाख ९४ हजारांचा बनावट गुटख्यासह मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई पोलिस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलिस अधीक्षक डॉ.अजय देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली परिविक्षाधीन पोलीस उपाधीक्षक अंकिता कणसे यांच्या नेतृत्वातील पथकामधील पोलीस अमलदार अनिल जगदाळे, राहुल दरोडे, सचिन चंद्रपाटले, बाळू कांडनगिरे, चालक चव्हाण तसेच पोलीस स्टेशन निलंगा येथील पोलीस अमलदार बालाजी सोमवंशी, जीवने यांनी केली आहे.

# पोलिसाने केलेल्या गोळीबारात एकाचा मृत्यू; ऑनलाईन गेमिंगमुळे कर्जबाजारी मुंबई पोलिसाला न्यायालयीन कोठडी



**भिवंडी/प्रतिनिधी**

तालुक्यातील पडघा पोलिस ठाण्याच्या हद्दीत १३ ऑक्टोंबर रोजी चोरीच्या उद्देशाने मुंबई पोलीस दलातील जवानाने केलेल्या गोळीबारात गंभीर जखमी झालेल्या दोघा युवका पैकी अजीम अस्लम सय्यद वय ३० या युवकाचा मृत्यू झाला आहे, अशी माहिती ठाणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने यांनी दिली आहे. ते या गुन्ह्या बाबत माहिती देण्यासाठी भिवंडीत आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. याप्रसंगी अप्पर पोलिस अधीक्षक डॉ. दिपाली धाटे, उपअधीक्षक प्रशांत ढोले, स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश मनोरे, भिवंडी ग्रामीण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रणवीर बायेस आदी उपस्थित होते. या गोळीबार प्रकरणी अटक केलेला आरोपी सुरज देवराम ढोकरे हा मुंबई पोलीस दलातील शस्त्रागार विभागात कार्यरत होता. या घटने पूर्वी सूरज ढोकरे हा सप्टेंबर महिन्या पासून एकूण चार वेळा अंबाडी ते वासिंद या पाईप लाईन मार्गे जाणाऱ्या रस्त्यावर आला होता असे तपासात निष्पन्न झाले आहे. त्या दरम्यान त्याने कोणाला लुटले होते का याचा तपास पोलीस यंत्रणा करीत आहे. त्याला पैशांवर खेळल्या जाणाऱ्या ऑनलाईन गेमचे वेड होते. त्याच्या आहारी गेल्याने त्यावर ४० लाख रुपयांचे कर्ज झाले होते. गोळीबार केल्याच्या दिवशी ही त्याकडे कर्जाच्या हप्त्यासाठी मोबाईल फोन करून तगादा लावला होता. त्या मधून त्याचा त्रागा झाल्याने त्याने हा आडवाटे च्या चोरीचा मार्ग अवलंबला होता. सात दिवसांच्या पोलिस कोठडी नंतर आरोपी सूरज ढोकरे यास भिवंडी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याची रवानगी न्यायालयीन कोठडीत केली आहे अशी माहिती पोलिस अधीक्षक विक्रम देशमाने यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.

# सात हजारांची लाच घेताना सरकारी वकिलाला अटक!

**पालघर/प्रतिनिधी**

पोलिस कर्मचारी निर्दोष असल्याचा अहवाल देण्यासाठी सरकारी वकिलाने लाच मागितली होती. पालघरच्या अतिरिक्त सत्र न्यायालयातील वकील सुनील बाबूराव सावंत यांनी सात हजारांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले. पालघर जिल्हा पोलिस दलातील नाईकपदावर असलेल्या कर्मचाऱ्यावर २०१५ मध्ये तारापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल होता. जून २०२३ मध्ये न्यायालयाने तक्रारदाराला निर्दोष जाहीर केले होते. त्यानंतर पालघर जिल्हा पोलिस दलाकडून तक्रारदाराने पदोन्नतीसाठी अर्ज केला होता. त्याबाबत अधीक्षक कार्यालयाकडून अतिरिक्त सरकारी अभियोक्ता (सरकारी वकील) पालघर यांच्याकडे पत्रव्यवहार करून निर्दोष सुटल्याबाबत अहवाल मागण्यात आला होता. तो अहवाल पोलिस अधीक्षक कार्यालयाला देण्यासंबंधी अतिरिक्त सरकारी अभियोक्ता सावंत यांनी तक्रारदाराकडे दहा हजार रुपये लाचेची मागणी केली होती. मात्र तडजोड करण्यात आल्यावर सात हजार रुपयांची रक्कम ठरवण्यात आली. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून हुतात्मा स्मारकाजवळ उपअधीक्षक दयानंद गावडे, पोलिस निरीक्षक शिरीष चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा रचण्यात आला होता. रक्कम घेताना सरकारी वकिलाला रंगेहाथ पकडण्यात आले. सरकारी वकील सुनील सावंत हे पालघर न्यायालयात सरकारी वकील म्हणून गेल्या सात वर्षांपासून काम करत आहेत.

# पोलिसांची दिशाभूल करणाऱ्यावर गुन्हा दाखल

**वाडा/प्रतिनिधी**

राज्यातील नागरिकांना आपात्कालीन परिस्थितीत पोलीस सेवा एकाच टोल फ्रि क्रमांकावर उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने, महाराष्ट्र राज्यात डायल-११२ आपत्कालीन प्रतिसाद प्रणाली कार्यान्वीत करण्यात आलेला आहे. त्या अंतर्गत पालघर जिल्हयातील सर्व पोलीस ठाणेस दुचाकी व चारचाकी वाहने पुरविण्यात आलेली आहेत. डायल ११२ वरुन आलेल्या तक्रारीस तात्काळ मदत मिळण्यात यावी यासाठी २४ तास पोलीस अंमलदार हे कर्तव्यासाठी नेमलेले आहेत. याचा गैर फायदा घेत वाडा तालुक्यातील वसुरी खुर्द येथील एका इसमाने पोलिसांना खोटी माहिती देऊन दिशाभूल केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहिती नुसार शनिवारी(दि.२१) अडीच वाजताच्या सुमारास ब्ल्यु स्टार कंपनी, वसुरी खुर्द शिळेपाडा येथून संजय गणपत सुर्वे याने डायल ११२ वर कॉल वाडा माझ्या डोक्याला संदीप नावाच्या व्यक्तीने गोळी मारली व मला जीवे मारण्याचा प्रयत्न केला असलचे सांगून मला पोलिसांची मदत हवी आहे. असा संदेश मिळताच वाडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षम सुरेश कदम यांनी पोलीस निरीक्षक चंद्रकांत हाके, मयुरेश अंबाजी, विजय डाखोरे,पल्लवी बाणे पोलीस हेड कॉन्स्टेबल चेतन सोनवाने, गजानन जाधव, बाबासाहेब घुगे यांच्यासह इतर पोलीस कर्मचारी घेऊन घटनास्थळी पोहोचले व कॉल करणारी व्यक्ती संजय गणपत सुर्वे (वय ४७) भेटले. मात्र गोळीबाराची चौकशी केली असता अशा घटना घडली नसल्याचे निदर्शनास आले. यावेळी सदर कॉलरने पोलिसांना खोटी माहिती देऊन दिशाभूल केल्याचे दिसून आल्याने त्याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. जिल्ह्यातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते कि, डायल ११२ हा क्रमांक नागरिकांना आपात्कालीन परिस्थितीत पोलीस सेवा तात्काळ मिळावी यासाठी हा टोल फ्री क्रमांक कार्यान्वीत केलेला आहे. त्यामुळे कोणीही पोलीसांची दिशाभुल होण्याच्या उद्देशाने डायल ११२ वर कॉल करु नये. अन्यथा असे दिशाभुल कॉल करणाऱ्यांवर वरीलप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येईल, असे आवाहन करण्यात येत आहे.

# सफाळे येथील महिला खूनप्रकरणी आरोपीला पोलिसांनी ठोकल्या बेड्या



**पालघर/एच.लोखंडे**

६ जून २०२३ रोजी श्रीमती पद्मा बहादूरसिंग बिक वय वर्षे ५७, रा. ९ स्टार लॅन्ड मार्क माकणे सफाळे पश्चिम हिचा मांडे गावातील मुजबादेवी मंदिरासमोरील रोडच्या पलीकडे प्रसन्ना ठाकूर यांच्या शेतात. कोणीतरी अज्ञात व्यक्तींनी ओढणीच्या सहाय्याने गळा आवळून खून झाल्याची तक्रार फिर्यादी मयत महिलेच्या मुलांने दिली असताना. सफाळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता, बाळासाहेब पाटील पोलीस अधीक्षक पालघर यांनी श्रीम. निता पाडवी-पोलीस. उपविभागीय अधिकारी पालघर यांच्या कडे सोपविण्यात आलेला. यासंदर्भात पंकज शिरसाठ- अप्पर पो. अधिक्ष, निता पाडवी-उपविभागीय पो. अधिकारी पालघर, अनिल विभुते-पो.निरीक्षक. (स्थानिक गुन्हे शाखा पालघर) यांनी वेगवेगळ्या दिशेने तपास करण्यासाठी तिन पोलीस पथके तयार करून गुन्ह्याचा तपास सुरू केलेला. सदर तपास पथकांनी तांत्रिक पुराव्यांच्या आधारे, व मिळून आलेल्या माहिती हिचा कौशल्य वापर करीत. गुन्ह्यातील संशयित आरोपी राजेश बिजिरे सोनार वय वर्षे २१, रा. सफाळे, करण मान सिंग वय वर्षे ३० रा. सफाळे यांना ताब्यात घेतले असून, कसून चौकशी केल्यावर सदर गुन्हा त्यांनी, व त्याचा एक साथीदार श्रीम. पद्मा बिक हिचा तिच्या अंगावर असलेल्या दागिने मिळविण्यासाठी तिचा ओढणीने गळा आवळून खून केल्याचे निष्पन्न झाले. गुन्ह्यातील दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली असून तिसरा आरोपी यांचा तपास सुरू आहे. सदर हि कारवाई मा. बाळासाहेब पाटील पो. अधिक्षक पालघर, पंकज शिरसाठ- अप्पर पो. अधिक्षक पालघर, यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीम. निता पाडवी-उपविभागीय पो. अधिकारी पालघर, अनिल विभुते- स्था. गु. शाखा पालघर, सफाळे पो. ठाणे प्रभारी पोलीस अधिकारी अविनाश मांदळे पो. निरीक्षक, अमोल गवळी सपोनि, गणपत मुळे - पोउपनि, सावंत/देसाई-पोउपनि, तसेच स्थानिक गुन्हे शाखा, सफाळे पो. ठाणे पो. अंमलदार यांच्या पथकाने यशस्वी कामगिरी केली आहे. या बद्दल सफाळे नागरिक यांच्या कडून पोलीस बांधवांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# ‘प्राचीन भारतीय ऋषी व कृषी परंपरेला स्वीकारून शेती समस्यांवर मात शक्य’

## ‘शाश्वत योगिक शेती’चे सफल प्रयोग करणारे शेतकरी ब्र.कु.बाळासाहेब रुगे यांचे प्रतिपादन

वसई/प्रतिनिधी

प्राचीन भारतीय ऋषी आणि कृषी परंपरेला स्वीकारून, शेती समस्यांवर मात शक्य हे वरील शीर्षक हे मात्र एक अनुमान नसून, मागील २१ वर्षांपासून ‘शाश्वत योगिक शेतीचे’ सफल प्रयोग करणारे शेतकरी श्री. बाळासाहेब रुगे यांनी नावझे येथील शेती प्रशिक्षण कार्यक्रमा दरम्यान सांगितलेला त्यांचा जीवन अनुभव आहे. आध्यात्म आणि निसर्ग अतिशय घट्ट संबंध असणाऱ्या दोन गोष्टींची विज्ञाना सोबत सुयोग्य सांगड घालून वर्तमानात शेती संबंधी असलेल्या समस्यांचे मूळ कारण व त्या वरील नैसार्गिक उपाययोजना शेतकरी बांधवाना मार्गदर्शनपर कार्यक्रमात संगतील्या. ज्यात त्यांनी जैविक खत कसे बनवावे, नैर्सर्गिक पद्धतीने कीटकनाशके बनवणे, जमिनीचा कस वाढवणे आदिंचे मार्गदर्शन केले. ब्र.कु. भारती यांनी शेतकरी राजाला मानवंदना दिली व कार्यक्रमाचे सूत्र संचालन केले. समस्यांनी




थकून जाऊन शेती पासून परावृत्त न होता, राजा बनून आपल्या व्यवसायला सफलतेकडे न्यायला हवे आणि याकरिता, राजयोग मेडिटेशनच्या माध्यमातून, वर्तमानकाळातील मृगजळासमान तात्पुरते आकर्षण स्वरूप गोष्टींसाठी आपली शेत जमीन ना विकता, भारताच्या योगशक्तीला ओळखावं आणि सोबतच जीवनात आचरणात आणावं जेणे करून यशाच्या मागे धावावं लागणार आणि पण यशच आपल्या पाठी येईल, हे स्वानुभवाच्या आधारे वर्णन केले व उपस्थितांना राजयोग मेडिटेशनचा अनुभवही करवला. दोन दिवसीय शिबिराचा लाभ नावझे आणि आसपासच्या साखरे, गिराळे, पारगाव परिसरातील जवळ जवळ ५0हुन अधिक शेतकरी बांधवांनी घेतला. हजर शेतकऱ्यांनी नवीन पद्धती बद्दल उत्सुकता दाखवली. पैकी एक शेतकरी श्री मिलिंद यांनी या पद्धतीचा अवलंब करून शेती करण्याचा निर्णय केला आणि त्यांच्या शेतीत श्री. बाळासाहेब रुगे, ब्र.कु. भारती, ब्र. कु. केशव यांनी भेट दिली. श्री बाळासाहेब यांनी त्यांना याबद्दल अधिक मार्गदर्शन केले. स्व. वत्सला वसंत पवार माध्यमिक विद्यालय, नावझे येथे हा कार्यक्रम संपन्न झाला. ब्रह्मा कुमारीज आणि नावझे ग्रामपंचायत अशा संयुक्त विद्यमाने कार्यक्रमात विद्यालय कमिटी अध्यक्ष व तंटामुक्ती अध्यक्ष अनिल पाटील यांनी हिरीरीने पुढाकार घेत शाळेतर्फे संपूर्ण सहयोग दिला. उद्घाटन प्रसंगी सरपंच दामोदर लाबड, उपसरपंच प्रफुल्ल पाटील, सहकार्यवाहक अनंत सोगले, चेअरमन अनंत पाटील, विनोद पाटील, पोलीस पाटील किशोर पाटील, तुषार पाटील, मुख्याध्यापिका श्रीमती फेगडे, स्थानीय सफल व्यवसायीक ब्र. कु. बकुल शाह आदी मान्यवर अतिथी रूपात लाभले. कार्यक्रमाच्या समापनादरम्यान ब्र. कु. केशव यांनी सर्वांचे आभार प्रकट केले. सर्व उपस्थितांना, वरिष्ठ राजयोगिनी ब्र. कु. सुनंदा यांच्या हस्ते ‘योगिक शेती’ची मार्गदर्शन पुस्तिका व सोबत रामफळाचे रोप भेट देण्यात आली.

# आश्रमशाळेतून राष्ट्रीय पातळीवरील खेळाडू घडवावेत-प्रकाश निकम




पालघर/प्रतिनिधी

पालघर जिल्ह्यात असलेल्या आश्रमशाळांमध्ये शिक्षणाव्यतिरिक्त इतर अनेक उपक्रम चांगल्या प्रकारे राबवले जातात त्यामध्ये विविध क्रीडा स्पर्धा देखील आयोजित केल्या जातात, या खेळांच्या माध्यमातून शिक्षकांनी आश्रम शाळेमधून राष्ट्रीय स्तरावरचे खेळाडू घडवावेत, असे प्रतिपादन जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम यांनी केले आहे. २७/१०/२०२३ रोजी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प जव्हार विनवळ येथे प्रकल्पस्तरिय क्रीडा स्पर्धेचा उद्घाटन सोहळा अध्यक्ष प्रकाश निकम यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी ते बोलत होते. तसेच आदिवासी आश्रमशाळे मुळेच आमच्यासारखे लोकप्रतिनिधी घडले आहेत, त्यामुळे आश्रम शाळेच्या मी कायम ऋणात राहीन अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली. प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी नेहा भोसले, क्रीडा प्रमुख प्रकल्प स्तरीय संजय सूर्यवंशी, सरपंच लीलावती मोरे यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम यांनी आदिवासी समाजामध्ये दहावी बारावीनंतर शाळा सोडण्याचे प्रमाण खूप मोठे आहे, त्यामुळे या स्पर्धेच्या माध्यमातून मुलांनी अर्धवट शाळा न सोडण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच मुलींना १८ वर्षांपूर्वी व मुलांना २१ वर्षांपूर्वी विवाह न करण्याची शपथ सुद्धा दिली. आश्रमशाळेतील शिक्षक शाळेतील मुलांना स्वतःच्या मुलांप्रमाणे जपतात त्यामुळे त्यांचेही कौतुक यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम यांनी केले. सदर प्रसंगी सर्व मुख्याध्यापक, सर्व खेळाडू स्पर्धक, आश्रम शाळा जव्हार प्रकल्पाचे शासकीय व अनुदानित कर्मचारी उपस्थित होते.

# ‘मेरी माटी मेरा देश’अंतर्गत एआयएसएसएमएस अभियांत्रिकी महाविद्यालय येथे अमृत कलश संकलन सोहळा उत्साहात संपन्न

पुणे/प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत मेरी माटी मेरा देश उपक्रम देशभर राबवला जात असून त्या अनुषंगाने एआयएसएसएमएस महाविद्यालयांमधील राष्ट्रीय सेवा योजना मधील स्वयंसेवकांनी माती कलशा मधे भरून महाविद्यालयात संकलित करण्याचा भव्य सोहळा गुरुवार दि. २६ ऑक्टोबर रोजी पार पडला. याप्रसंगी स्वयंसेवकांनी टाळ्यांच्या गजरात मान्यवरांचे व पाहुण्यांचे स्वागत केले. राष्ट्रीय सेवा योजनेची कार्यक्रम अधिकारी डॉ. नाना शेजवळ यांच्या मार्गदर्शना अंतर्गत कार्यक्रम पार पडला. आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत मेरी माटी मेरा देश अभियान राबवणे कामी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ समिती स्तरावरील माती कलशाचे संकलन ए.आय.एस.एस.एम.एस. अभियांत्रिकी महाविद्यालयात करण्यात आले. यावेळी सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे राष्ट्रीय स्वयं राष्ट्रीय सेवा योजना ते संचालक माननीय



सदानंद जी भोसले सरांचे मार्गदर्शन लाभले. माननीय संचालक सर यांना यांनी महात्मा गांधीजींच्या विचारातील संकल्पनेच्या आधारे स्वयंसेवकांना राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना व त्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी एखाद्या वृक्षा सारखे परोपकारी भावनेने समाजाच्या विकासासाठी हातभार लावला पाहिजे असे आवाहन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर डी.एस. बोरमणे यांनी महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या विद्यार्थी विमुख आणि होणाऱ्या योजनांची माहिती दिली कार्यक्रम अधिकारी आणि जिल्हा समन्वयक पुणे विद्यापीठ डॉ.नाना शेजवळ यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना मांडली. राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी अक्षय पवार यांनी सूत्रसंचालन व अदिती शिंदे ने आभार प्रदर्शन केले. याप्रसंगी देवदत्त धबडगावकर, रोहित माळी, दर्शन शेवाळे, सेजल बोबडे, ललित शिंपी प्रथमेश बोडके, यश कांबळे, ईशा पठारे यिनचे पदाधिकारी निलेश पाटोळे व निल व्यास उपस्थित होते.

## पाण्यासाठी मनसेचा वसई-विरार महापालिका कार्यालयावर महामोर्चा

# वसई विरार शहराच्या पाण्यासाठी आयुष्यातली पहिली केस घेण्यासाठी तयार - शर्मिला ठाकरे

विरार/प्रतिनिधी

माझ्यावर आजवर एकही केस नाही. परंतु वसई विरारच्या पाण्यासाठी मी आंदोलन करून पहिली केस घ्यायला तयार आहे, असे शर्मिला ठाकरे यांनी शासनाला ठणकावले. पुढील ५ दिवसांत जर वसई विरार शहराला पाणी दिलं नाही तर आम्ही कायदा हातात घेऊन पाणी सुरू करू, असा इशारा त्यांनी दिला. वसई विरार महापालिकेवर पाण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या मोर्चात त्यांनी सरकारला हा इशारा दिला. वसई विरार शहराला सुर्या पाणी प्रकल्पातून १८५ दशलक्ष लिटर्स पाणी देण्यात येणार आहे. मात्र जुलै महिन्यापासून हे पाणी रोखून धरण्यात आले आहे. यासाठी मनसेतर्फे शुक्रवारी वसई विरार महापालिकेवर महापालिकेवर मनसे तर्फे महामोर्चा काढण्यात आला होता. मनसे पक्ष प्रमुख राज ठाकरे यांच्या पत्नी शर्मिला ठाकरे यांनी या मोर्चाचे नेतृत्व केले. पंतप्रधानांनी



काल दुसऱ्या शहरातील धरणाचे उद्घाटन केले. मात्र अद्याप वसई विरार शहराला पाणी दिलेले नाही. शहराला पाणीपुरवठा करणारी धरणे पूर्ण भरली आहेत. मात्र वसईकर नागरिक तहानलेले आहेत. जुलै महिन्यापासून प्रत्येक वेळेला पाणी रोखून धरण्यात आलेले आहे. हे पाणी जर पुढील पाच दिवसात दिले नाही तर मी रस्त्यावर उतरून आंदोलन करणार आणि स्वतः पाणी सुरू करून असे शर्मिला ठाकरे यांनी सरकारला ठणकावले. माझ्या राजकीय कारकिर्दीमध्ये माझ्यावर एकही केस नाही. मात्र वसई विरारच्या नागरिकांसाठी मी आंदोलन करून पहिली केस घेण्यासाठी तयार आहे, असेही त्यांनी सांगितले. पाणी देण्यासाठी त्यांनी सरकारला ५ दिवसांची मुदत दिली आहे. मनसेच्या या मोर्चासाठी हजारोंच्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी चोक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# आद्यकवी रामायणकार वाल्मिकी ऋषी यांची जयंती उत्साहात साजरी




लातूर/प्रतिनिधी

तालुक्यातील बोरगाव येथे आद्यकवी रामायणकार वाल्मिकी ऋषी यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी आझाद आदिवासी कोळी सामाजिक संघटना महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष नरसिंग आयलेवाड यांची उपस्थिती प्रामुख्याने होती. प्रारंभी आद्य कवी रामायणकार वाल्मिक ऋषी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर पदमीनबाई इंगळवाड उपसरपंच ज्ञानोबा जाधव, पोलीस पाटील श्रीरंग माखणे, ग्रामसेवक विठ्ठल माने, चेअरमन देविदास करकल, आदी मान्यवर उपस्थित होते. जयंतीचे औचित्य साधून गावातील गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याची वाटप यावेळी करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी अध्यक्ष कवी वाल्मिकी ऋषी यांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकत आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी अंकुश इंगळवाड सुरेश हुगे सतीश कंचे महादेव रजावाड शिवमूर्ती आचरे करण अंटू यांच्यासह गावातील महिला मंडळ व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पालघर जिह्यात सरपंचपदांसाठी १९४ उमेदवार रिंगणात

पालघर/प्रतिनिधी

पालघर जिल्ह्यातील ५१ ग्रामपंचायतींच्या सर्वसाधारण निवडणुका ५ नोव्हेंबरला होणार आहेत. ४७ सरपंचांच्या जागांसाठी १८१ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. एकूण ५६९ सदस्यांसाठी १,६२६ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. बुधवारी (ता. २५) शेवटच्या दिवशी ४२४ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले, तर ५१ सदस्यांच्या जागांसाठी एकच नामनिर्देशन पत्र आल्याने त्या बिनविरोध झाल्या आहेत. काही प्रभागांत नामनिर्देशन पत्र आले नसल्याने आठ जागा रिक्त राहिल्या आहेत, तर पालघर तालुक्यातील दोन ग्रामपंचायती बिनविरोध झाल्या आहेत. डहाणू तालुक्यातील पाच सदस्य बिनविरोध झाले आहेत. आता १७ ग्रामपंचायतींच्या १९२ सदस्यांसाठी ५४६ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. कापसी ग्रामपंचायतीमध्ये चार, चिंचणी ग्रामपंचायतीमध्ये एक सदस्य बिनविरोध झाला आहे. तलासरी तालुक्यात एकूण १२२ सदस्य निवडून द्यायचे होते. त्यापैकी गिरगाव ग्रामपंचायतीचे तीन सदस्य




बिनविरोध आहेत. उर्वरित १११ सदस्यांसाठी ३१५ सदस्य निवडणुकीच्या रिंगणात आहेत. वसई तालुक्यात ३८ सदस्यांपैकी अर्नाळा किल्ला ग्रामपंचायतीचा एक सदस्य बिनविरोध झाला. ३४ जागांसाठी ९९ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. वसई तालुक्यात एकूण उमेदवारांचे प्राप्त झालेले अर्ज १५८ त्यातील ५९ उमेदवारांनी माघार घेतली. एकूण निवडणूकीच्या रिंगणात ९९ उमेदवार आपले नशिब आजमावणार आहेत. बिनविरोध अर्नाळा किल्ल्यामधील प्रभाग क्र. ३ मधील एक जागा पोटनिवडणूक अडणे व भिनार मधील प्रभाग क्र.३ मधील दोन जागा उमेदवार लढवित आहे. निवडणूक कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण कार्यक्रम वसई तहसील कार्यालयाच्या सभागृहात तहसीलदार अविनाश कोष्टी व नायब तहसीलदार चंद्रकांत पवार यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. विक्रमगड तालुक्यातील दोन ग्रामपंचायतींच्या निवडणुकीसाठी २० जागांपैकी चापके तलवली ग्रामपंचायतीची एक सदस्य बिनविरोध झाला आहे. १७ जागांसाठी ५२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. जव्हार तालुक्यातील एक ग्रामपंचायतीच्या निवडणूक होणार असून नऊ सदस्यांसाठी २५ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. मोखाडा ग्रामपंचायतीच्या चार ग्रामपंचायतींसाठी ३८ सदस्यांपैकी डोलारेमध्ये सहा व ...पान ६ वर

# चंद्रशेखर बावनकुळे यांच्या भिवंडी संवाद यात्रेत गुजरातच्या टोप्या!



भिवंडी/प्रतिनिधी

भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शनिवारी भिवंडीत संवाद यात्रा कार्यक्रमास हजेरी लावली. यावेळी बावनकुळे यांनी पद्मा नगर येथील भाजी मार्केट मधील भाजी विक्रेत्यांसह व्यापाऱ्यांशी चर्चा करत आवडते पंतप्रधान कोण आणि पुढचा पंतप्रधान कोण हवा असे प्रश्न विचारले बावनकुळे यांच्या प्रश्नांना व्यापाऱ्यांनी मोदी अशी उत्तर दिली. विशेष म्हणजे या भिवंडी लोकसभेच्या संवाद यात्रेत भाजप कार्यकर्त्यांसह बावनकुळे यांच्या डोक्यात घातलेल्या टोप्या या गुजरात वरून आल्या होत्या. विशेष म्हणजे हा कार्यक्रम अत्यंत घाई घाईने केला असून टोप्या देखील गुजरात वरून आणल्याची कबुली खुद्द केंद्रीय पंचायतराज मंत्री कपिल पाटील यांनी सुपर वॉरियर्सच्या कार्यक्रमाप्रसंगी बावनकुळे यांच्या समक्ष दिली.

# औशात मनोज जरांगेच्या पाठींब्यासाठी साखळी उपोषण

औसा/प्रतिनिधी

मराठा समाजास ओबीसी मधून कुणबी म्हणून आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील हे बुधवार दि. २५ पासून अंतरवली सराटी गावात शांततेत आमरण उपोषण करीत आहेत. मात्र याकडे शासन स्तरावर कुठलीच दखल घेतली नाही. म्हणून जरांगे पाटील यांच्या उपोषणास पाठिंबा म्हणून औसा तालुका सकल मराठा समाजाच्या वतीने बेमुदत साखळी उपोषण येथील तहसील कार्यालया समोर करण्यात येत आहे. मनोज जरांगे पाटील हे मराठा समाजाला कुणबी म्हणून आरक्षण मिळावे यासाठी लढा देत आहेत. या पूर्वीही त्यांनी उपोषण केले होते. मात्र खुद्द मुख्यमंत्री व सरकार यांनी तीस दिवसात आरक्षण देऊ असे जाहीर केले. मात्र ४१ दिवस उलटले मात्र अद्याप आरक्षण मिळाले नाही आता सकल मराठा समाज पेटून उठला आहे.




राज्यात सर्वत्र शांततेत विविध मार्गाने आंदोलने, उपोषण होणार आहेत तसेच राजकीय पुढारी यांना गाव बंदी करण्यात येत आहेत. आता औसा तालुक्यातील मराठा समाजाच्या वतीने बेमुदत साखळी उपोषण करून सरकारचे लक्ष वेधले जाणार असून तालुक्यातील सर्व मराठा समाज बांधवांनी आयोजित साखळी उपोषणास आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन औसा तालुका समस्त सकल मराठा समाज व प्रदीप मोरे, गोपाळ धानुरे, शाम भोसले, नागेश मुगळे, गणेश गायकवाड, सदाशिव जोगदंड, विकास हत्तरगे, वैजनाथ सूर्यवंशी, बाबा थोरात, बालाजी जाधव यांनी केले आहे.

# जव्हार येथे धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात साजरा

पालघर/एच लोखंडे

बौद्ध धर्मियांच्या मान्यतांनुसार, भारतामध्ये लुप्त झालेल्या बौद्ध धम्माचं चक्र बाबासाहेबांनी गतिमान करत ’धम्मचक्र प्रवर्तन’ केलं म्हणून हा दिवस धम्मचक्र प्रवर्तन दिन म्हणून ओळखला जातो. या अनुषंगाने ६७ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन ‘अशोका विजयादशमी’ म्हणून भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारक जव्हार येथे दिनांक २४ ऑक्टोबर २०२४ रोजी साजरा करण्यात आला. धम्मचक्र प्रवर्तन दिन हा भारतीय बौद्ध, नवबौध्द यांचा प्रमुख सण-उत्सव आहे. हा उत्सव म्हणजे एक धर्मांतर सोहळा असून, १४ ऑक्टोबर १९५६ रोजी मा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या अंदाजे ५ लक्ष अनुयायांना सह दीक्षाभूमी नागपूर येथे, नवयान, बौद्ध धर्माची दीक्षा घेतली होती. तेव्हापासून दरवर्षी अशोका विजया दशमी (दसरा) व १४



ऑक्टोबर भारत देशासह, जगभरातील लक्षावधी अनुयायी एकत्र येऊन हा उत्सव, सण साजरा करतात. या प्रसंगी जव्हार येथील कार्यक्रमात, या कार्क्रमाचे अध्यक्ष आयु. राजेशजी धात्रक यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आयु. भालचंद्र गायकवाड, आयु. अरुण जगताप मोखाडा शाखेचे अध्यक्ष आयु. कडलग तसेच प्रमुख वक्ते आयु. संजय साळवे यांनी दीप प्रजवलन केले. त्या नंतर डॉ बाबासाहेब आंबेडकर, पथ कोनशीला अनावरण करण्यात आले. नालदा विहार - मोखाडा याठिकाणी करण्यात केलेल्या उत्कृष्ट धम्म मेळाव्याचे औचीत्या साधित आयु. गायकवाड यांचा भव्य सत्कार करण्यात आला. त्या नंतर प्रमुख वक्ते आयु. संजय साळवे यांनी मुक्ती कोण पथे या विषयावर आपले विचार मांडले. उपस्थित मान्यवरानी हि शुभेच्छा पर आप आपले मनोगत व्यक्त केले. आयु. भागुबाई केदार, आयु.छबू बाई केदार, आयु. मुरलीधर शेवाळे यांनी भीमगीते ...पान ६ वर